

मुख्य संपादक : राजेंद्र वखरे

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे

# क्राईम बॉर्डर



पुणे वि.संपादक : नितीन सैद

www.crimeborder.com ★Year 13 ★ Issue 09 ★ Pages - 8 ★ Kalyan Dist Thane , 30 June 2023 ★ Price 5.00 /- R.N.I. NoN.I. No.. : MAHBIL/2010/41122 Mob- 9619630035

★ वर्ष : १३ ★ अंक : ०९ ★ पाने : ८ ★ कल्याण, जि. ठाणे, ★ ३० जून २०२३ ★ मूल्य : रु ५.००/- नोंदणी क्र.एमएएचबीआयएल/२०१०/४११२२


## जंगलात नेले एकटीला गाढून , बलात्कारानंतर केला खून ! नीच मोहम्मदच्या आवळल्या मुसक्या , रिक्षाने पटली खूण !

नवी मुंबई – तुर्भे

राजेंद्र वखरे

तुर्भे पोलीस ठाण्याचा हद्दीत अडवली भूतावली च्या निर्जन जंगलात सत्तीदेवीचे मंदिर व जवळच तलाव आहे. या ठिकाणी श्रद्धाळू भाविक दर्शन घेण्यासाठी



पोलीस आयुक्त **मिलींद भारंबे**



डिसीपी **विवेक पानसरे**

येत असतात. या देवीकडे मनात बोललेली इच्छा पूर्ण होते अशी आख्यायिका आहे. त्यामुळे ज्या ज्या लोकांना हे ठिकाण माहिती आहे, त्या ठिकाणी सण वार असला की, दर्शनासाठी भाविक येत असतात. या ठिकाणी जाण्या येण्यासाठी कच्ची पायवाट व कच्चा रस्ता आहे त्या रस्त्या वरून मोटरसायकल , रिक्षा व छोटी वाहने जातात. त्या दिवशी सुद्धा गावातील अंकुश बबन बुधवार व त्यांची पत्नी गीता जोडपे सत्तीदेवीच्या दर्शनासाठी सकाळी पायी चालत निघाले होते. रस्त्याने जाताना ते गप्पा गोष्टी करत देवीच्या मंदिरामध्ये पोहोचले. जंगलामध्ये झाडं झुडपं व जंगली प्राण्यां व्यतिरिक्त त्यांना काहीच दिसत नव्हते. या परिसरात मनुष्य वस्ती नसल्याने मौज मजा करणारे या जंगलाचा वापर करताना आढळतात. हे अडवली भूतावली गाव परिसर तुर्भे पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो. तुर्भे पोलीस ठाण्याचा पदभार अनुभवी अधिकारी व.पो.निरी. रवींद्र दौंडकर यांनी स्वीकारल्या पासून ते स्वत: परिसरात गस्तीवर असतात. तुर्भे परिसर संवेदनशील असल्याने आपल्या हद्दीत काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून ते काळजी घेत असतात. या परिसरातील चोऱ्यामाऱ्या व इतर अनुचित प्रकारांना त्यांनी व्यसन घातले आहे. त्यांनी आत्तापर्यंत अनेक किचकट गुन्हे उघड केले असून गुंडा पुंड त्यांना घाबरतात. सदर गावातील अंकुश बुधर हे कुटुंब सत्ती देवीचे दर्शन घेऊन सायंकाळी साधारणत: दहा वाजे च्या सुमारास त्यांच्या घराकडे जाण्यासाठी निघाले तिकडून पायी चालत येत असताना रस्त्याच्या कडेला डोंगराळ भागात त्यांना एक



पो.उप.निरी. **महेंद्र डोके**

अनोळखी महिला बाबळीच्या झाडाच्या फांद्याच्या आड निपचित पडलेली दिसली. उत्सुकतेपोटी ते त्या ठिकाणी कोण महिला झोपली आहे. हे पाहण्यासाठी जवळ गेले असता त्यांची पाचावर धारण बसली. त्या महिलेच्या डोक्यात कोणीतरी सिमेंट कॉंक्रीट चा दगड मारल्याने त्या महिलेचे डोके फुटले असून तिच्या डोक्यातून रक्त आलेले त्यांना दिसले.तसे ते घाबरले आणि तिथून धावत पळत घराकडे निघाले.आता काय करावे हे त्यांना सुचत नव्हते मग त्यांना अडवली भूतावली विभागात सामाजिक काम करणारे नगरसेवक रमेश चंद्रकांत डोळे यांची आठवण झाली.त्यांनी तात्काळ त्यांना फोन वरून सांगितले की, दादा आम्ही सत्ती देवीच्या दर्शनासाठी अडवली भूतावलीच्या जंगलात गेलो असता इकडनं जाताना आम्हाला काही दिसले नाही.



एसीपी **गजानन राठोड**



व.पो.निरी. **रवींद्र दौंडकर**

**उर्वरीत पान नं. २ वर...**

## कोंबड्या चोरांनी पाठलाग करणाऱ्या विनयचा केला निर्घुण खून !

नवी मुंबई

सौ.सिमा वखरे

**माणूस** जन्माला येतो परंतु तो कधी मरेल,स्वर्गवासी होईल ,त्याचा मर्डर होईल हे काही कुणाला सांगता येत नाही मग यामध्ये तरुण मुलं असोत की मध्यम, वयस्कर असोत, प्रत्येकाला वाटते की आपण खूप जगावे परंतु नियतीने कुणाच्या नशिबात काय लिहून ठेवले आहे हे मात्र कुणालाच समजू शकत नाही. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात असलेल्या उसर्ली गावात अवघ्या १९ वर्षाच्या तरुणाचा खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात शिवकर गाव आहे.गाव तसा शांत असून गावातील तरुण मुलं व माणसं ही जवळच असलेल्या पनवेल, नवी मुंबई , मुंबई, ठाणे, अलिबाग अशा ठिकाणी नोकरीसाठी जात असतात तर काही माणसं, तरुण मात्र गावातच काही उद्योग धंदे करून उदरनिर्वाह करीत असतात.अशा या शांत व निसर्गाच्या कुशीत वसलेल्या शिवकर गावात राहणारा विनय विनोद पाटील वय वर्षे १९ याचा



डिसीपी (गुन्हे) **अमित काळे**

अज्ञात इसमांनी रात्री दोन ते चार च्या दरम्यान अज्ञात कारणावरून



व.पा.निरी. **विश्वनाथ कोळेकर**

धारदार शस्त्रांनी त्याच्या शरीरावर अत्यंत क्रुरपणे वार करून त्याचा खून करून त्याचा मृतदेह मुंबई पुणे एक्सप्रेसवेच्या ब्रिजच्या खाली रोडालगत असलेल्या झुडपामध्ये ओढत नेऊन त्याला ठार मारून फेकून दिले. **उर्वरीत पान नं. ६ वर...**

## अल्पवयीन मुलगी प्रेमाला भुलली , प्रियकराने तिला गर्भवती करुन सोडली !

अंबरनाथ

सौ.सिमा वखरे

आज-कालची तरुणाई ही प्रेमाच्या नावाखाली वाटेल ते करायला तयार होते.अवघ्या बारा-तेरा वर्षांपासूनची मुलं, मुली मोबाईलच्या नादी लागतात. मग मोबाईल मध्ये नको ते वाईट, घाणेरडे कृत्य बघतात. त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर होतो. त्यांना आई-वडील, भाऊ, बहिणीपेक्षा मित्र मैत्रिणी जवळचे वाटतात परंतु जेव्हा त्यांची फसगत होते तेव्हा त्यांचे डोळे उघडतात तेव्हा पुला



व.पो.निरी.**ए.एस.भगत**



स.पो.निरी.**सुप्रिया देशमुख**

**उर्वरीत पान नं. ४ वर...**

## एकतर्फी प्रेमातून प्रियकराने तीन मित्रांसह केला बलात्कार !

कल्याण

राजेंद्र वखरे

त्या दिवशी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार आपल्या कामात व्यस्त होते. तेवढ्यात व काहीशा काव‌ऱ्या बावऱ्या अवस्थेत एक महिला व पुरुष आले व म्हणाले की, साहेब आमची मुलगी काल पासून बाहेर गेली ती परत आलीच नाही. आम्ही तिला खूप शोधले परंतु ती आम्हाला भेटली नाही कृपा करून तुम्ही आम्हाला आमची मुलगी शोधून द्या आम्ही तुमचे उपकार विसरणार नाही .त्यावर ठाणे अंमलदार म्हणाले की ,अहो काळजी करू नका पोलीस हे तुमच्यासाठीच आहेत असे सांगून त्यांनी त्यांना बसवले व सदर बाब व.पा.निरी.देशमुख यांच्या कानावर घातली. त्यांनी तात्काळ मिसिंगची तक्रार दाखल करुन घ्यायला सांगितली



व.पो.निरी.**डी.डी.देशमुख**



पो.उप.निरी.**दत्तात्रय गोडे**

**उर्वरीत पान नं.७ वर...**

# जंगलात नेले एकटीला गाठून, बलात्कारानंतर केला खून! नीच मोहम्मदच्या आवळल्या मुसक्या, रिक्षाने पटली खूण!

**पान नं. १ वरुन...** परंतु तिकडून येताना बाभळीच्या झाडाच्या फांद्याच्या आड एक महिला पडलेली दिसली.आम्ही तिच्या जवळ गेलो असता तिच्या डोक्यात कुणीतरी सिमेंट काँक्रीट चा दगड मारल्याचे आम्हाला दिसले.तिच्या डोक्या तून रक्तही बाहेर आलेले आहे. ती मरून पडली असल्याचे आम्हाला दिसले. तरी तुम्ही सदर घटनेची शहानिशा करा असे सांगितले.माजी नगरसेवक रमेश चंद्रकांत डोळे यांनी त्या कुटुंबाला धीर देत सांगितले की, तुम्ही घाबरू नका काय प्रकार आहे तो मी बघतो असे म्हणून ते तात्काळ त्यांच्या मित्रासह त्यांच्या गाडीने ज्या ठिकाणी ती तरुणी पडली आहे.त्या घटना स्थळी पोहोचले असता त्यांनाही ती तरुणी उताण्या अवस्थेत दिसली सदर महिलेचा कुणीतरी तीन-चार दिवसां पूर्वी खून केला असावा असे नगरसेवक रमेश डोळे यांना वाटले. ताबडतोब घटनास्थळा वरूनच तुर्भे पोलीस ठाण्यात फोन केला असता स्टेशन हाऊसला एपीआय अशोक डमाळ यांनी फोन उचलून जय हिंद बोला मी ठाणे अंमलदार एपीआय डमाळ बोलत आहे.मी आपली काय मदत करू शकतो. तेवढ्यात पलीकडून इसम म्हणाला की साहेब मी अडवली भूतावली गावचा माजी नगरसेवक रमेश डोळे बोलत आहे. हा बोला डोळे साहेब सकाळी सकाळी काय काम काढलं? असता ते म्हणाले की काम काही नाही आमच्या अडवली भूतावली च्या जंगलामध्ये असलेल्या सत्तीदेवी च्या मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कच्च्या रोडच्या बाजूला झाडाच्या फांदीच्या खाली एक महिला मयत झाली आहे. तिच्या डोक्यात कोणीतरी सिमेंट काँक्रीटचा दगड घातला असून तिच्या डोक्यातून रक्त बाहेर आलेले आहे. तर तो सिमेंट काँक्रीट चा दगड बाजूलाच पडलेला आहे कुणीतरी इसमाने तिचा अज्ञात कारणावरून खून केला असावा असे मला वाटते आणि हा खून तीन-चार दिवसांपूर्वी झाला असावा असेही तिच्या डेड बॉडीवरून दिसत आहे.एवढा मेसेज मिळतात घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ एपीआय अशोक डमाळ यांनी त्यांच्या वरिष्ठांना सदर माहिती दिली.त्यावेळेस व.पो.निरी.रवींद्र दौंडकर एका आरोपीं च्या शोधार्थ उत्तर प्रदेशात गेले होते.व ते नुकतेच कल्याण रेल्वे स्टेशनला उतरले होते.त्यांना आपल्या परिसरात तरुण महिलेचा खून झाला असून आम्ही तिकडे जात आहोत असा मेसेज दिला असता व.पो.निरी. रवींद्र दौंडकर म्हणाले की मी सरळ घटनास्थळी येतो. तुम्ही पोलीस पथक त्या ठिकाणी पोहोचा.घटनेची शहानिशा करण्या साठी स्टेशन डायरीला नोंद करून एपीआय अशोक डमाळ व बिट न.१ मार्शल पो.शि. मनवर घटनास्थळी रवाना झाले.त्या ठिकाणी माजी नगरसेवक रमेश डोळे उपस्थि होते. एवढे बोलून रवींद्र दौंडकर घरी न जाता सरळ घटनास्थळाकडे निघाले घटनास्थळी पोलीस पथक पोहोचले असता त्यांना त्या ठिकाणी एक अनोळखी महिला वय अंदाजे ३०/३२ वर्ष वयाची चार, साडेचार फूट, रंग गोरा, मध्यम बांधा, उबट चेहरा, कपाळी कुंकू, हातात हिरव्या रंगाच्या काचेच्या व पिवळ्या धातूच्या बांगड्या, कानात झुमके, गळ्यात काळ्या मण्याची पोत, तिने अंगात सफेद व काळ्या रंगाच्या पट्ट्यांचा कुर्ता व गुलाबी रंगाची सलवार त्यावर सफेद ठिपक्यांची डिझाईन असा पोशाख परिधान केलेला त्यांना दिसला तर तिच्या बाजूला एक सिमेंट काँक्रीट चा दगड रक्ताने माखलेला पडला होता. तर तिच्या कपाळावर मोठी जखम दिसत होती.घटनास्थळी व.पो.निरी. रवींद्र दौंडकर पोहोचले. त्यांनी मयत तरुणीचा, घटनास्थळाचा व परिसराचा बारकाईने अभ्यास करून तिचा कुणी तरी अज्ञात कारणा वरून खून केला असावा असा अंदाज बांधून त्यांनी तुर्भे विभागाचे डीसीपी विवेक पानसरे व एसीपी गजानन राठोड यांना सदर घटनेबाबत माहिती दिली असता ते तात्काळ घटनास्थळी पोहोचले त्यांनी मयत तरुणीचे निरीक्षण व पाहणी करून उपस्थित पोलिसांना मार्गदर्शन करत काही सूचना देऊन तिचा इन्क्वेस्ट पंचनामा करून सदर महिलेचे शव उत्तरीय तपासणीसाठी जवळच्या वाशी येथील सरकारी रुग्णालयात पाठवण्या च्या आदेश दिले. त्या ठिकाणी डॉग स्कॉड व इन्व्हेस्टीगेशन व्हॅन, आय बाईक ला पाचारण करण्यात आले. डॉग स्कॉड पथकाने आवश्यक कारवाई केली त्यानंतर एपीआय अशोक डमाळ यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर मयत महिलेच्या मृतदेहाचा इंटरेस्ट पंचनामा करून त्या ठिकाणाहून आवश्यक त्या वस्तू जप्त केल्या. सदर घटनास्थळ हे निर्मनुष्य जंगलात असल्याने मयत कोण व कुठून आली असावी आणि तिचा खून कोणी व कशासाठी केला? असावा तसेच ती तरुणी या ठिकाणी कशाने आली असावी या सर्व बाबी पोलिसांसमोर आ असून उभ्या होत्या व.पो.निरी.रवींद्र दौंडकर हे अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचे व किचकट गुन्हे सोडवण्यात निष्णांत असल्याने त्यांनी ताबडतोब या खुनाच्या गुन्ह्याचा छळा लावण्यासाठी चार टीम बनवल्या त्यामध्ये त्यांना विविध काम वाटून देण्यात आली. सदर घटनास्थळ हे महापे शिळफाटा रस्त्याकडून सत्ती देवी या गावदेवी मंदिराकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यालगत तबेल्याच्या वरील बाजूस बाभळीच्या झाडा जवळ अडवली गाव नवी मुंबई येथे असल्याने सदर घटनास्थळ नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील तुर्भे पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येते. या घटने संदर्भात माजी नगरसेवक रमेश चंद्रकांत डोळे यांची फिर्याद नोंदवून घेण्यात आली त्या ठिकाणी दोन पंचांना बोलावून त्यांच्या समक्ष घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावरून मिळून आलेल्या वस्तू, हत्यार, कपडे, मयताच्या अंगावरील दागिने इत्यादी वस्तू जप्त करून जागीच सीलबंद करण्यात आल्या. मयत तरुणीचे प्रेत पो.ना.मनवर यांच्या ताब्यात देऊन महानगरपालिका हॉस्पिटल वाशी, नवी मुंबई या ठिकाणी पाठवून देण्यात आले. माजी नगरसेवक रमेश चंद्रकांत डोळे यांच्या तक्रारी वरून तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र.११७/२०२३ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हाची नोंद करण्यात आली. त्या घटना स्थळा वरून सदर महिलेचे विविध अँगलने छायाचित्र घेऊन घेण्यात आले. व.पो. निरी.रवींद्र दौंडकर यांनी वैद्यकीय अधिकारी मनपा हॉस्पिटल वाशी यांना विनंती केली की, आम्हाला मयत तरुणीच्या संदर्भात अहवाल तात्काळ द्यावा. सदर तरुणीचा खून कधी व किती तासापूर्वी झाला असावा तसेच महिलेच्या सोबत काही अनुचित प्रकार घडला आहे का? ते आम्हाला ताबडतोब लेखी रिपोर्ट द्वारे कळवावे. अशी विनंती केली असता तात्काळ मनपा हॉस्पिटल वाशीचे वैद्यकीय अधिकारी यांनी सदर प्रेतावर पोस्टमार्टम करून त्यात मयत तरुणीचा विसेरा, टिशू रक्त नमुना राखून ठेवले व सदर तरुणीचा खून हा कुणीतरी तीन दिवसांपूर्वी केला असून खूनाच्या अगोदर तिच्यावर बलात्कार झाला असल्याचे वैयक्तिक अधिकारी यांनी त्यांच्या रिपोर्टमध्ये नमूद केले. आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेवर बलात्कार करून तिचा खून झाला असल्याचे व.पो.निरी.रवींद्र दौंडकर यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी ताबडतोब या गुन्ह्याचा छडा लावण्या साठी अधिकारी व कर्मचारी यांची चार पथके तयार करून एपीआय शिउरकर यांच्या पथकास घटनास्थळाच्या आजू बाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याबाबत मार्गदर्शन करून आदेश दिले.त्याचप्रमाणे एपीआय पवन नांद्रे यांच्या पथकास आपल्या हद्दीत जाऊन मयताचे फोटो दाखवून माहिती काढण्या बाबत सांगितले तर एपीआय साबळे, पो.उपनिरी.महेंद्र डोके यांना दम डाटा घेऊन तांत्रिक तपास करण्याबाबत सूचित केले . एपीआय घेवडेकर यांना पोलीस ठाणे कडील व नवी मुंबईतील मिसिंग महिलांची माहिती घेण्याबाबत आदेश दिले तसेच पोलीस ठाण्याकडील इतर अधिकारी /अंमलदार घटनास्थळावर आजू बाजूच्या झाडे झुडपात सूक्ष्म पाहणी करून मयताच्या वस्तू आणि आरोपीने सोडलेल्या वस्तूंचा शोध घेण्याचे काम त्यांना दिले.सदर गुन्हा तील महिला कोण आहे? तिचे नाव व पत्ता काय आहे? त्याचे वारस कोण? याबाबत पोलीस तपास करू लागले. सदर मयत तरुणीचे छायाचित्र काढून ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, मुंबई, नवी मुंबई उपनगर, रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष पोलीस कर्मचारी जाऊन त्यांना आपल्या पोलीस ठाण्यात कोणी तरुणी मिसिंग आहे का? याची पाहणी केली असता त्यांना त्या त्या हद्दीतून कुणी तरुणी / अशा वर्णनाची मिसिंग असल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे पोलिसांसमोर मोठे आवाहन निर्माण झाले होते की, सदर मयत तरुणी कोण आहे? सर्वप्रथम तिची ओळख पटणे गरजेचे होते परंतु पोलिसांना तिची ओळख पटवता येत नव्हती तसे त्यांचे प्रयत्न चालू होते त्यांनी आपापल्या खबऱ्यांना कामाला लावले. व.पो.निरी. रवींद्र दौंडकर यांनी गुन्हे प्रकटीकरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची मीटिंग घेऊन चर्चा केली त्यांनी त्या परिसरात सीसीटीव्ही फुटेज नसल्याने इंटरनेटच्या माध्यमातून मॅप नुसार माहिती काढण्याच्या आदेश दिले असता त्यांना इंटरनेटच्या माध्यमातून तांत्रिक विश्लेषणातून काहीतरी माहिती हाती लागेल अशी आशा होती जवळजवळ त्या जंगलात जाणाऱ्या रस्त्याच्या आजूबाजूला मुख्य रस्त्या वरून येणाऱ्या जाणाऱ्या जवळच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले पण त्यांना हाती काहीच लागले नाही तेव्हा व.पो.निरी. रवींद्र दौंडकर यांनी स्वत: इंटरनेटच्या साह्याने तपास आरंभला तेव्हा तुर्भे स्टोअर्स पासून एक तरुणी एका रिक्षात बसताना त्यांना दिसली ती रिक्षा पुढे जात असताना त्यांना दिसली परंतु त्या रिक्षाचा नंबर दिसत नव्हता पुढे ती रिक्षा एका हॉटेल जवळ थांबली तेथून काहीतरी घेऊन एक इसम पुन्हा रिक्षा बसला ती तरुणी सुद्धा खाली उतरून पुन्हा बसली त्यामुळे ती महिला त्या रिक्षातून पुढे गेली हे निष्पन्न झाले पण ही रिक्षा कोणाची आहे तिचा नंबर काय हे काही पोलिसांना दिसत नव्हते परंतु पोलिसांनी त्या रिक्षाच्या मागचा हुलिया बघून अशा प्रकारची रिक्षा कोणाची आहे याची ओळख पटवण्याचे काम केले असता त्यांना सदर रिक्षाही नवी मुंबईतील एका इसमाची असल्याचे लक्षात आले त्यांनी रिक्षा स्टॅन्ड वरून व खबरच्या मदतीने ती रिक्षा कोणाची आहे याचा तपास करून त्या इसमाला पोलीस ठाणे बोलवले आणि त्या रिक्षाबाबत विचारले असता तो म्हणाला की ही रिक्षा माझीच आहे परंतु ही रिक्षा मी भाड्याने चालवायला मोहम्मद अहमद मोहम्मद अली राईन याला दिली आहे. तो आता दहिसर मोरी, ठाकूरपाडा या ठिकाणी राहतो तेव्हा पोलिसांनी तात्काळ मोहम्मद अहमद मोहम्मद अली राईन याची माहिती घेतली. पोलिसांनी ताबडतोब मोहम्मद अहमद मोहम्मद अली राईन हा राहत असलेल्या ठिकाणाचा पत्ता घेऊन एक पोलीस पथक तात्काळ दहिसर मोरी या ठिकाणी रवाना केले त्या ठिकाणी पोलिसांना मोहम्मद घरीच सापडला परंतु त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची रिक्षा त्यांना आढळून आली नाही त्यांनी त्याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले आणि त्याच्या कडे त्या तरुणी बाबत चौकशी केली असता तो ताकास तूर लागू देत नव्हता तेव्हा पोलिसांनी त्याला खास पॉलिसी इंगा दाखवत तुझ्या रिक्षातून सदर तरुणी प्रवास करत होती आणि तू तिचे काय बरे वाईट केले आहे याची आम्हाला संपूर्ण माहिती मिळालेली आहे तू आता बऱ्या बोलाने खरेखरे सांग अशी तंबी दिली असता तो घाबरला आणितो म्हणाला की साहेब मीच तिचा खून केला आहे आणि हे ऐकून पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला. पोलिसांनी त्याच्याकडे याबाबत सविस्तर माहिती विचारली असता त्याचे पूर्ण नाव मोहम्मद अहमद मोहम्मद अली राईन वय वर्ष ३६ धंदा रिक्षा चालक राहणार दहिसर मोरी, ठाकूर पाडा जि. ठाणे असे असून त्याचे **उर्वरीत पान नं.३ वर...**



पो.हवा. **पी.जे.मराडे**



पो.शि. **सकट**



पो.शि. **उघडे**



मयत अनोळखी महिला



संशयित आरोपी **मोहम्मद**

# जंगलात नेले एकटीला गाठून, बलात्कारानंतर केला खून !नीच मोहम्मदच्या आवळल्या मुसक्या, रिक्षाने पटली खूण !

**पान नं.२वरुन...** मूळ गाव हे आतागंज रतासो,पो.करहिया,ता. सलवन, जि.रायबरेली राज्य उत्तर प्रदेश अशी त्याने माहिती दिली. त्याची पहिली एक बायको त्याच्या गावी राहते तर त्याने दुसरे लग्न केले असून त्याला दुसऱ्या बायकोपासून दोन मुली आहेत तो पूर्वी तुर्भे येथे राईन वस्तीमध्ये राहत होता त्याची दुसरी बायको ही त्याच्या नात्यातीलच आहे तो या ठिकाणी राहत असताना त्याला घर भाडे परवडत नव्हते उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असल्याने त्याने त्याची बायको व मुलांना स्वस्त मिळणाऱ्या घर भाड्याच्या दृष्टीने दहिसर मोरी याठिकाणी ठाकूरपाड्यात भाड्याने रूम घेतली. त्या ठिकाणी स्वस्त त्याला रूम भाड्याने मिळाली होती तो नवी मुंबई तुर्भे स्टोअर्स व परिसरात रिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करत होता त्या दिवशी तो अशीच पॅसेंजरची वाट पाहत असताना एक तरुणी त्याला दिसली ही दिसायला सुंदर होती तो तिच्याजवळ गेला आणि म्हणाला की मॅडम कुठे जायचे आहे तेव्हा तिने सांगितले की मला घेऊन चल मी तुला सांगते कुठे जायचे आहेआणि ती त्याच्या गाडीमध्ये बसली रिक्षा सरळ अडवली रस्त्याने जाण्याच्या अगोदर एका ठिकाणी तो थांबला त्याने एक दारूची बाटली सोबत घेतली काही खाण्याच्या वस्तू घेतल्या आणि तो त्या महिलेशी बोलत बोलत रिक्षा चालवत निघाला. त्याची कामवासना जागृत झाली आणि तो तिला म्हणाला की चल मी तुला फिरवून आणतो एका ठिकाणी चांगले ठिकाण आहे तेव्हा ती महिला सुद्धा त्याला म्हणाली की ठीक आहे मलाही काम नाही चल मी तुझ्यासोबत येते आणि मग तो तिला घेऊन निघाला असता त्याला कुठेच सेफ जागा मिळत नव्हती परंतु त्याला अडीवली जंगलाची माहिती होती. व या ठिकाणी मौजमजा मस्ती करण्या साठी तरुण-तरुणी व आंबट शौकीन त्यांच्या गर्लफ्रेंडला घेऊन जात असतात हे त्याला माहीत असल्याने तो तिला घेऊन अडवलीच्या जंगलात घेऊन निघाला. तो निर्मनुष्य ठिकाणी तिला घेऊन तिथे गेला आणि ते खाली उतरले तो तिला म्हणाला की चल मी तुला या ठिकाणी एक स्थळ आहे ते दाखवतो आणि त्याने तिला घेऊन त्या ठिकाणी असलेल्या झाडाच्या कडेघेऊन जाऊ लागला तेव्हा ती म्हणाली कि तू मला कुठे घेऊन जात आहे? तेव्हा तो म्हणाला की तू आता माझी इच्छा पूर्ण कर तिने त्याला विरोध केला असता त्याने तिला बळजबरी त्या ठिकाणी जमिनीवर खाली पडले आणि तिच्यावर जबरी बलात्कार केला त्यानंतर मात्र ती महिला त्याला म्हणाली की तू मला आता या कामाचे एक हजार रुपये दे पण तो म्हणाला की माझ्याकडे पैसे नाही तेव्हा ती म्हणाली की तू मला पैसे दिले नाहीस तर मी रस्त्यावर येऊन धिंगाणा करेल व पोलिसात तक्रार करेल हे ऐकून तो घाबरला त्याला वाटले की उगाच झंझट नको. परंतु त्याच्या जवळ पैसे नसल्याने त्याने विचार केला कि आपल्याला या ठिकाणी येतांना कोणी बघितले नाही आपण हिचा कायमचा काटा काढू आणि निघून जाऊ असे म्हणून त्याने तिला तिथे मारहाण करायला सुरुवात केली ती ओढायला लागली परंतु तिचा आवाज ऐकायला तिथे कोणीच नव्हते त्याने तिला खाली पाडले व बाजूला पडलेला सिमेंट कोंकरेन्टचा दगड उचलला आणि तिच्या डोक्यात हाणला आणि ती त्या फटक्यासरशी खाली पडली आणि तडफडू लागली तो बघत होता थोड्या वेळात तीची तडफड बंद झाली तिच्या डोक्यातुन रक्त वाहू लागले होते. त्याला वाटले की आता ही मेली असे समजून तो तिथून निघून गेला त्याला वाटत होते की, आपल्याला कोणी बघितले नाही आणि आपल्याला कोणी शोधू शकता नाही. त्याने त्याची रिक्षा ही एका ठिकाणी लपवून ठेवली होती पोलिसांनी त्याला रिक्षा बाबत विचारले असता तो काही सांगत नव्हता परंतु त्याला खास पॉलिसी खाक्या दाखवला असता तो घाबरला आणि त्याने ती लपवून ठेवलेली रिक्षा पोलिसांना दाखवून दिली आणि पोलिसांनी ती रिक्षा सुद्धा ताब्यात घेतली आणि जप्त केली त्याला त्या तरुणीच्या खुनाच्या गुन्ह्यात रीतसर अटक केली आणि त्याला कोर्टात हजर केले असता त्याला कोर्टाने पोलिओस रिमांड मंजूर केला व.पो.निरी. रवींद्र दौंडकर यांनी मोहम्मद याला विचारले की ती तरुणी कोण व कुठली आहे तिचे नाव गाव पत्ता काय आहे? असे विचारले असता तो म्हणाला कि साहेब तिला मी ओळखत नाही. तीला मी पहिल्यांदाच बघितले त्यामुळे पोलिसांना पुन्हा प्रश्न पडला की ही मयत तरुण महिला कोण आहे. परंतु त्या तरुण महिळेच खून कुणी व का केला हे स्पष्ट झाले होते परंतु आपल्या परिसरातील खुनाचा शोध त्यांनी लावला होता एका तरुण महिलेला जंगलात नेऊन तिच्या वर बलात्कार करून तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी मोहम्मद राईन ला पोलिसांनी अटक केली आहे. परंतु मयत तरुण महिला कोण आहे याचा त्याचा शोध लागला नसून पोलिसांनी आवाहन केले आहे की सदर महिला कुणाच्या ओळखीची असल्यास त्यांनी ताबडतोब तुर्भे पोलिसांची संपर्क साधावा सदर तरुण महिलेचे प्रेत पोलिसांनी राखून ठेवले आहे.परिसरात एका महिलेवर बलात्कार करून तिचा खून केल्या प्रकरणी माहिती झाल्याने संतापचे वातावरण निर्माण झाले होते पोलिसांनी सदर गुन्ह्यातील आरोपीला पकडल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे. संशयित आरोपी मोहम्मद राईन याने पोलिसांना दिलेल्या माहितीवरून त्याच्या वर भा.द.वि. कायदा कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली आहे. या संदर्भात संशयित आरोपी मोहम्मद राईन याने पोलिसांना तपासा दरम्यान सांगितले की, सदर महिलाही माझ्या रिक्षामध्ये बसली होती तिला मी विचारले की कुठे जायचे आहे तेव्हा ती म्हणाली की चल मी तुला सांगते कुठे जायचे आहे. ज्या ठिकाणी जायचे आहे त्या ठिकाणी गेल्यावर ती म्हणाली की मी येथे उतरते आहे परंतु माझ्याकडे भाड्याचे द्यायला पैसे नाही तेव्हा मोहम्मद म्हणाला कि तुम्हाला तर पैसे द्यावेच लागतील. पण माझ्याकडे पैसे नाही तुला काय करायचे ते करून घे आणि मग मी तिला घेऊन त्या जंगलामध्ये गेलो त्या ठिकाणी मी तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले त्यानंतर मात्र ती मला एक हजार रुपये मागू लागली माझ्याकडे पैसे नव्हते मी तीला म्हटलं की माझ्याकडे पैसे नाही तेव्हा तिने मला धमकी दिली की तू जर मला पैसे दिले नाही तर मी आल्यावर केस दाखल करेल मी घाबरून गेलो. मग मी तिच्या डोक्यात तो सिमेंट कॉंक्रीनचा दगड मारून तिचा खून केला अशी त्याने माहिती दिली त्यामुळे आता पोलीस तपास करत आहे की सदर महिला हे कोण व कुठली आहे पोलिसांनी सदर महिलेचा त्या अनुषंगाने ही तपास केला की ती कुण्या बार मध्ये कामाला होती का याचाही पोलिसांनी तपास केला परंतु ती कुठल्याही बार मध्ये कामाला नसल्याचे पोलिसांना आढळले पोलिसांनी वेश्या वस्ती सुद्धातपासल्या तशा ठिकाणी सुद्धा पोलिसांना तिची काही माहिती मिळालेली नाही त्यामुळे सदर महिला कोण व कुठली आहे हे अद्याप गुलदस्त्यात असून पोलीस तिचा तपास करत आहे जर कुणास हाही महिला कोण कुठली आहे याची ओळख पटल्यास त्यांनी तुर्भे पोलिसांची संपर्क साधावा असे आवाहन व.पो.निरी. रवींद्र दौंडकर यांनी केले आहे.

या गुन्ह्या संदर्भात नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय मोहिते, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ वाशी चे विवेक पानसरे तसेच तुर्भे विभागाचे सहायक पोलीस आयुक्त गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कुठलाही धागा दोरा नसताना तुर्भे पोलीस ठाण्याचे तपासा धिकारी व.पो. निरी.रवींद्र दौंडकर यांनी पो.निरीसंजय जोशी, एपीआय प्रभाकर शिउरकर ,एपीआय पवन नांद्रे, एपीआय अशोक डमाळे, पो. उपनिरीक्षक महेंद्र डोके व पो.हवा. मराडे, पो.ना. भालेराव, पो.शि. आघाव, पो.शि.उगाडे ,पो.शि. गर्दनमारे यांनी परिश्रम घेतले.

## क्राईम बॉर्डर के महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी पद पर शशिधर सुवर्णा नियुक्त



क्राईम बॉर्डर

(प्रधान कार्यालय)


'पुलिस और अपराध जगत की जानकारी देने वाले 'क्राईम बॉर्डर ' के महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी पद पर डोंबिवली स्थित शशिधर सुवर्णा इनके सामाजिक कार्य को नजर में रखते हुए प्रधान संपादक राजेंद्र वखरे इन्होने उनकी

**क्राईम बॉर्डर** के महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी पद पर नियुक्ती घोषित कर दि है.

शाशिधर सुवर्णा क्राईम बॉर्डर और क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) के माध्यम से सामाजिक कार्य करने की इच्छा रखते है

उनकी नियुक्ती हे मित्र परिवार में खुशी का माहौल छाया है सबसे उनको बधाई दि है

## रिल बनवताना विहिरीत पडला, ३२ तास शोधाशोध, तीन दिवसानंतर अखेर सापडला मृतदेह



**डोंबिवली** : तरुणांमधील रिल बनवण्याचं फॅड दिवसे न्दिवस वाढत आहे. ते इतकं की वेगळं काही करण्याच्या आणि इम्प्रेशन झाडण्याच्या नादात या तरुणांना आपला जीवही गमवावा लागत आहे. डोंबिवलीच्या ठाकुर्ली येथेही अशीच धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना घडली आहे. ठाकुर्ली पंपहाऊस येथे रिल बनवत असताना एक तरुण विहिरीत पडला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलाच्या मदतीने त्याचा शोध घेतला. तब्बल ३२ तासाच्या अथक प्रयत्नानंतर या तरुणाचा मृतदेह शोधण्यात पोलिसांना यश आलं आहे

ठाकुर्ली येथील पंपहाउसमधील खोल विहिरीत पडून मृत्यू एका १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना ठाकुर्ली परिसरात घडली आहे. बिलाल सोहिल शेख असे तरुणाचे नाव आहे. हा तरुण दोन मित्रांसह शनिवारी सायंकाळी ठाकुर्ली येथील पंपहाउस येथे रिल बनवण्यासाठी गेला होता. रील काढताना तोल जाऊन बिलाल विहिरीत पडला. दरम्यान त्याच्या दोन मित्रांनी तात्काळ ही माहिती विष्णूनगर पोलिसांनी दिली. माहिती मिळताच पोलीस आणि फायर ब्रिगेडच्या जवानांनी तरुणांचा शोध सुरू केला. तब्बल ३२ तासाच्या शोध मोहिमेनंतर अग्निशामक दलाच्या जवानांनी अखेर विहिरीतून त्याचा मृतदेह शोधून काढला.

मुंब्रा येथे राहणारा १८ वर्षीय बिलाल सोहिल शेख हा तरुण दोन मित्रांसह शनिवारी सायंकाळी ठाकुर्ली येथील पंपहाउस येथे रिल काढण्यासाठी गेला होता. रील काढताना बिलाल विहिरीत पडला. हे पाहून त्याचे दोन मित्र जवळील रेल्वे सुरक्षा बलाकडे गेले. मित्रांनी माहिती देताच रेल्वे सुरक्षा बलाने विष्णूनगर पोलिसांना कळविले. विष्णूनगर पोलिसांनी डोंबिवली पश्चिमेकडील अग्निशामक दलाला माहिती दिली. स्थानक अधिकारी रामचंद्र महाला, विनय कोयंदे, राजेश कासवे, केदार मराठे, महिला कर्मचारी या पथकांनी सदर ठिकाणी शोध कार्य सुरु केले. ३२ तास शोध कार्य सुरु होते. सोमवारी सायंकाळी बिलाला यांचा मृतदेह अग्निशामक दलाच्या जवानांना बाहेर काढण्यास यश आले.या विहिरीत प्रचंड गाळ असल्याचं सांगण्यात येतं. तसेच ही विहीर खोल होती. त्यामुळे या मुलाचा शोध घेण्यात अडचणी निर्माण होत होत्या. या सर्व कारणांमुळेच या मुलाचा शोध उशिराने लागल्याचं सूत्रांनी सांगितलं. दरम्यान, मुंब्रा येथे राहत असताना केवळ रिल काढण्यासाठी हा तरुण ठाकुर्लीला आल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

# अल्पवयीन मुलगी प्रेमाला भुलली , प्रियकराने तिला गर्भवती करून

**पान नं. १ वरुन...** खालून बरेच पाणी वाहून गेलेले असते . विशेषता यामध्ये अल्पवयीन मुलीनां प्रेमाच्या नावाखाली वासनांध जाळ्यात ओढून त्यांचा शारीरिक उपभोग घेऊन फसवण्याचे प्रकार अलीकडे खूप वाढले आहे. अशाच प्रकारे एका अल्पवयीन मुलीची फसगट झाली व तिला तिच्या प्रियकराने गर्भवती करून सोडले.कविता ही ठाणे जिल्ह्या तील अंबरनाथ पूर्व येथे तिची आई, बहीण व भाऊ यांच्यासह राहायला आहे. तिचे वडील आनंदनगर एमआयडीसी पूर्व येथे ग्राइंडर चालवण्या चे काम करतात व त्यातून मिळणाऱ्या मिळकतीवर ते त्यांच्या कुटुंबा चा उदरनिर्वाह चालवतात. हे कुटुंब मूळचे बिहार राज्यातील असून त्यांचे मूळ गाव सासाराम, जिल्हा रोहतास असे असून कामधंद्याच्या शोधार्थ मुंबईमध्ये आले. या ठिकाणी गावाकडील ओळखीच्या मित्रांकडून त्यांनी अंबरनाथ पूर्व एमआयडीसी मध्ये काम मिळविले हळूहळू त्यांची ओळख वाढली व पगारही वाढला आणि मग त्यांनी त्यांचे कुटुंब अंबरनाथ येथे आणले मुला मुलींनी शिकवून सवरून नोकरीला लागावे व आपल्या आयुष्य चांगले जगावे असे कविताच्या आई-वडिलांना वाटत होते.कविता आता बारावी पास झाली होती. ती तिच्या आईसोबत उल्हासनगर, कल्याण, अंबरनाथ या ठिकाणी कामानिमित्त जात होती तसे पाहता ती आता समजदार झाली असल्याने मुलीने शिकून आपले नाव मोठे करावे असे तिच्या आईला वाटत होते. तिची आई तिला समजदारीच्या चार गोष्टी सांगत होती.समाजातील लोकांशी व मुलांसोबत कशाप्रकारे वागावे हेही तिला सांगत होती तिची आई तिला म्हणाली की कविता आता तू बारावी पास झाली आहेस. तुला शिक्षणासाठी अंबरनाथ सोडून दुसरीकडे जावे लागेल म्हणून तू कोणते कॉलेज चांगले आहे? कुठे ऍडमिशन घ्यायचे आहे? त्याचा तपास कर आणि मग तिने तपस करून उल्हासनगर नंबर-४ येथील एका कॉलेजमध्ये बी. कॉम. च्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला.अंबरनाथ ते उल्हासनगर हे अंतर तर जवळच असल्याने तिच्या आई-वडिलांना फारशी काळजी नव्हती.कविता आता कॉलेज मध्ये जायला लागली. कॉलेज मधील वातावरण नवीन मुलं मुली पाहून तिला वाटत होते की, आपण यांच्यापैकी चांगल्या मुला मुलीशी मैत्री करूया परंतु पुढच्या क्षणी तिला तिच्या आईने दिलेले संस्कार आठवायचे आणि मग ती मोजकेच मित्र-मैत्रिणींशी बोलत असायची परंतु हळूहळू तिला कॉलेजमधील वातावरण मित्र मैत्रिणीचे वागणे बघून आपल्यालाहि मित्र असावा असे वाटू लागले . कविताने घरी तिच्या आई-वडिलांना सांगून एक चांगला मोबाईल सुद्धा मिळवून घेतला ती म्हणाली की मला अभ्यासासाठी मोबाईल हवा आहे आणि अभ्यासाचे नाव एकताच तिच्या वडिलांनी तिला एक चांगला मोबाईल घेऊन दिला.मोबाईल आल्यानंतर एक चांगला मोबाईल नंबर ही त्यांनी त्यात घेतला मग आता कविताला करलो दुनिया मुठी मे हे वाक्य आठवले कारण सर्व जगच तिच्या हातामध्ये आले होते.इंटरनेटच्या माध्यमातून ती आता अनेक गोष्टी बघू शकत होती ,ऐकू शकत होती ,फेसबुक इंस्टाग्राम यासारख्या माध्यमातून बघू लागली आणि हाताळू लागली तिला त्यात गंमत वाटत होती इंस्टाग्राम च्या माध्यमातून तिला अनेक मित्र मैत्रिणी भेटले ती सर्वांशी इंस्टाग्राम व फेसबुकच्या माध्यमातून संपर्कात राहू लागली.तिचे फोटो अपलोड करू लागली खऱ्या अर्थाने ती कॉलेजचे जीवन जगू लागली असं तिला वाटत होतं. तिला वाटायचे की, खरोखरच प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये कॉलेजचे जीवन यावे आणि ते जीवन आपण जगले पाहिजे खूप मजेत तिचे दिवस चालले होते तसे पाहता टी अजून अठरा वर्षाची झाली नव्हती अल्पवयीन होती.अभ्यासात हुशार असलेली कविता आता समाज माध्यमावर जास्त रमू लागली होती इंस्टाग्राम हे तिची आवडते फंक्शन झाले होते.एक दिवस बिहार राज्यातील सासाराम जिल्हा रोहतास येथील राहणारा धीरज देवराज चंद्रवंशी वय २२ याने संपर्क साधला.त्यांची इंस्टाग्रामच्या माध्यमातून ओळख झाली . कविताला वाटले की आपल्या राज्यातील व आपल्या गावचा असलेला तरुण इतक्या लांबून आपल्याशी मैत्री करत आहे म्हणून तिला आनंद झाला ती त्याच्याशी इंस्टाग्राम च्या माध्यमातून बोलू लागली. तो तिचे अपलोड केलेले फोटो बघत होता धीरजने कविताला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवण्याचे ठरवले.कविता व धीरज ची ओळख होऊन आता काही दिवस झाले होते त्या दोघांच्या ओळखीचे रूपांतर त्यांच्या मैत्रीत झाले. हळूहळू धीरज एक एक पायरी ओलांडत होता एके दिवशी असेच इंस्टाग्राम वर गप्पागोष्टी करत असताना तो म्हणाला की कविता तू मला खूप आवडतेस मला तुझ्यासारखी प्रेयसी व पत्नी म्हणून मिळाला तर मी स्वत:ला भाग्यवान समजेल हे ऐकून ती लाजली. तिच्या सौंदर्याचं वर्णन ऐकून तिला खूप बरं वाटलं आणि ती म्हणाली की मी तुला इतकी आवडते , मी इतकी सुंदर आहे का? त्यावर धीरज म्हणाला की , हो तू खूप सुंदर आहेस . या जगातील एकमेव अशी सुंदरी तू आहेस . त्याच्या गोड गोड बोलण्याला ती फसत गेली आणि धीरजने तिला विचारले की , मी तुझ्यावर खूप प्रेम करतो तू माझ्या प्रेमाचा स्वीकार कर असे त्याने प्रपोजल तिला दिले. धीरजने प्रपोज केलेले तिला आवडलं परंतु ती म्हणाली की , मला विचार करायला थोडा वेळ दे त्यावर तो म्हणाला की, हरकत नाही कारण मी तुला माझी जीवनसंगिनी बनवणार आहे.त्यासाठी तुला विचार करायला वेळ द्यावाच लागेल. तू विचार कर आणि मला खात्री आहे की तू माझे प्रपोजल स्वीकारशील कारण मला तुझ्या सोबत माझे सर्व आयुष्य काढायचे आहे. त्यावर तिने त्याच्याकडून वेळ मागून घेतला आणि दुसऱ्या दिवशी तिने त्याला त्याच्या प्रेमाचा होकार कळविला. धीरजला आता स्वर्ग दोनच मोठे उरला होता त्याने एक पायरी पुढे ओलांडली होती त्याने कविताचा विश्वास संपादन केला होता आणि तिच्या कडून प्रेमाची संमती सुद्धा मिळवून घेतली होती. कविता व धीरज हे तासनतास वेळ मिळेल तेव्हा एकमेकांशी फोनवर बोलू लागले होते दोघेही बिहार राज्यातील असल्याने व एकाच परिसरातील रहिवासी असल्याने शिवाय त्यांची बोलीभाषा सारखी असल्या कारणाने त्यांच्यामध्ये जवळीकता लवकर निर्माण झाली होती आणि जवळीक वाढवून मैत्री झाली व मैत्रीचे रूपांतर प्रेमात सुद्धा झाले होते. एक दिवस धीरज कविताला म्हणाला की, तुझे वय किती आहे?तेव्हा ती म्हणाली की, माझे वय अजून अठरा वर्षे पूर्ण झालेले नाही. तेव्हा धीरज मनाला की हरकत नाही तू काळजी करू नकोस तुझे वय१८वर्षे पूर्ण झाले की, मी तुझ्याशी लग्न करेल तू बिनधास्त रहा तू मला खूप आवडतेस. मला तुझ्याशीच लग्न करायचे आहे.मी तुझ्याशिवाय कुणाशीच लग्न करणार नाही असे म्हणून धीरजने कविताचा विश्वास संपादन केला. आता कविता सुद्धा धीरजच्या प्रेमामध्ये वेडी-पिसी झाली होती.तिला फक्त धीरजच दिसायचा उठता बसता तिला धीरजचशीच बोलायला आवडत होते म्हणून ती पटापट घरातले कामे आवरून कॉलेजच्या नावाखाली घरातून लवकर निघायची आणि तासंतास धीरजशी बोलायची. कविता च्या आई वडिलांना वाटत होते की, आपली मुलगी खूप अभ्यास करत आहे आणि ती आपले नाव रोशन करील.अभ्यासासाठी ती लवकर कॉलेजमध्ये जाते अभ्यास करते परंतु त्यांना काय माहीत होते की, आपली मुलगी अभ्यासाच्या नावाखाली काय करत आहे, कारण प्रत्येक आईवडिलांना वाटते की, माझा मुलगा व मुलगी चांगले आहेत.आता धीरजला कविता हवी हवीशी वाटत होती. कधी एकदा आम्ही कविताला भेटतो आणि तिच्यासोबत मौज मजा करतो असे त्याला झाले होते.तो तिला भेटण्याची कारणे शोधत होता. त्याला आता फक्त कविता दिसत होती तर कविताला सुद्धा फक्त धीरजच दिसत होता.ते दोघेजण एकमेकाला भेटण्यासाठी आतुर झाले होते. धीरज कविताला म्हणाला की मला असे वाटते की तू माझ्या जीवनात खूप पूर्वीपासून आलेली आहे.त्याच्या गोड बोलण्यावर कविताने खूप विश्वास ठेवला आणि धीरजने तीचा विश्वास संपादन केला. तो तिला म्हणाला की, मला तुला भेटायचे आहे आणि मी तुला भेटायला येईल तेव्हा ती म्हणाली की ठीक आहे ये हरकत नाही. आपण भेटूया एका दिवशी त्याने फोन केला व तिला म्हणाला की माझी बहीण गुजरात येथे दिली असून तिला मी भेटण्यासाठी तिला भेटायला येणार आहे. तिला भेटून मी लगेच तुला भेटण्यासाठी अंबरनाथ येथे येतो.त्यावर ती सुद्धा म्हणाली की हरकत नाही ये भेटायला.धीरजला कविताला भेटायचे असल्याने तो बिहार वरून बहिणीला भेटण्यासाठी आला तेथे पाहुणचार वगैरे झाला परंतु त्याला तिथून लवकर सटकायचे होते तो बहिणीला म्हणाला की ताई मला आता जायचे आहे परंतु मला मुंबईला माझ्या एका मित्राला भेटून परस्पर घरी जायचे असल्याने मी आता जातो असे बोलून तो कविताला भेटायला येतोय असा त्या निरोप दिला. रात्री तो गुजरातहून मुंबईला यायला निघाला त्याने कविताला सांगितले की, मी तुला भेटायला अंबरनाथला येत आहे तू तयार रहा तेव्हा ती म्हणति कि ठीक आहे तू किती वाजेपर्यंत येशील तेव्हा तो म्हणाला की मी सकाळीच आठ वाजता धीरज अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे पोहेचला आणि त्याने कविताला फोन केला तो म्हणाला की, अंबरनाथ रेल्वे स्टेशनवर मी पोहेचलो आहे.तू ताबड तोब घरातून निघून मला भेटायला ये हा निरोप एकताच कविता म्हणाली की, ठीक आहे मी पोहेचतेच आणि तिने आईला सांगितले की आज मला लवकरच कॉलेजला जावे लागणार आहे . कॉलेजमध्ये खूप महत्त्वाचे काम आहे , त्यावर तिची आई म्हणाली की ठीक बेटा आहे काहीतरी खाऊन जा पटापट तिने सकाळची कामे आटोपली आणि तयारी केली ती कॉलेजला जायला निघाली जाताना ती आईला म्हणाली की आई मला आज यायला उशीर होऊ शकतो.माझे काळजी करू नकोस मी माझ्या मैत्रिणी सोबत असेल असे म्हणत घरातून निघाली . सरळ अंबरनाथ रेल्वे स्टेशन जवळील शिवाजी चौकात पोहेचली साधारणता तिला तिथे पोहेचायला व घरातील कामे आवरून निघायला दहा वाजले होते धीरज हा तिची चातका सारखी वाट बघत होता. त्या दोघांनी एकमेकांना ओळखून हातात हात घेतला तेव्हा ती म्हणाली की, मी घरून लवकर निघणार होते परंतु सकाळची कामं असल्याने येता आले नाही त्या बद्दल स्वारी. यावर तो म्हणाला की ठीक गंकाही काळजी करू नकोस मी तुझ्यासाठी वाट बघायला तयार आहे. त्यानंतर धीरज म्हणाला की, मी तुला खासकरून भेटण्यासाठी बिहार वरून येथे आलो आहे. मी बहिणीला भेटून लगेच तुला भेटण्यासाठी आलो आहे आपण इथून कुठेतरी बाहेर फिरायला जाऊ या तेव्हा कविता म्हणाली की , नको नको आपल्याला कोणी बघितले तर? माझ्या घरी माहिती पडले तर ? असेच ती लाडिकपणे त्याला म्हणाली त्यावर तो म्हणाला की तू अजिबात घाबरू नकोस मी तुझ्यासोबत आहे . मी तुझ्याशी लग्न करणार आहे मी तुला माझी जीवनसाथी बनवणार असल्याने काळजी करू नकोस. तुझे व माझे प्रेम आहे ,हे लोकांना आज नाही तर उद्या माहिती पडेलच तू एवढा विचार करू नकोस. मी सांगतो तेवढे ऐक आपण जवळ पास कुठेतरी फिरायला जाऊ त्यावर ती म्हणाली की ठीक आहे माझ्या राहा तू म्हणशील तसं . त्यावर इथे फिरायला जाण्यासाठी कुठली चांगली जागा आहे का?त्यावर ती म्हणाली की, मला माहित नाही मी काही कुणासोबत अशी फिरायला गेलेली नाही. मग तो म्हणाला की ठीक आहे राणी थांब मीच चौकशी करतो आणि धीरज हा एका रिक्षावाल्याकडे गेला आणि म्हणाला की या ठिकाणी पिकनिक पॉईंट कुठे आहे. आम्हाला फिरायला जायचे आहे. त्यावर त्या रिक्षावाल्याने त्याला सांगितले की या ठिकाणी जवळच आहे. त्या ठिकाणी तुम्ही फिरायला जाऊ शकता अशी जोडपी कुठे फिरायला जातात हे त्या रिक्षावाल्यास चांगलेच माहित होते. मग धीरजने स्पेशल रिक्षा केली.घाबरत घाबरत कविता रिक्षामध्ये बसली तिने तोंडाला ओढणी बांधली जेणेकरून तिला कोणी ओळखणार नाही. तेथून रिक्षा भरधाव सरळ ते चिखलोली डॅम कडे निघाली त्या दोघांनी स्पेशल रिक्षा केली असल्याने रिक्षावाल्याने अंबरनाथ पूर्व येथील डॅम वर नेले. तिथे त्याने रिक्षाचे भाडे दिले आणि रिक्षावाला तेथून निघाला. आता कविता व धीरज हे दोघेजणच होते. डॅमवर त्यांनी नाश्ता वगैरे केला. आणि गप्पा गोष्टीत ते रमले दुपार केंव्हा झाली हे त्या प्रेमवीरांना समजलेच नाही.होती दुपारचे दोन वाजले होते. चिखली डॅम येथे थोडीफार वर्दळ असल्याने कविता धीरजला म्हणाली की या ठिकाणी खूपच लोक आहे आपण दुसरीकडे जाऊ या मला भीती वाटते. मला कोणी ओळखले तर? आणि कुणी माझ्या घरी सांगितले तर? त्यावर धीरज म्हणाला की तू घाबरू नकोस गं राणी मै हूं ना काही होणार नाही. मी तुझ्यासोबत असताना तुला घाबरण्याची काय गरज आहे . असे म्हणून त्याने तिचा हात गच्च हातात धरला . आजूबाजूच्या परिसराचा अंदाज घेत त्याने मनोमन एक कट रचला हळूहळू लोकांची दुपार झाल्याने त्यातील गर्दी आपोआपच कमी झाल्याने त्याने कविताचा हात पकडला आणि चिखली डॅमच्या परिसरात असलेल्या दाट झाडांमध्ये तो तिला घेऊन गेला. कविता खाली बसत नव्हती परंतु हात पकडला व तिला बळजबरीने खाली बसवले तो तिला म्हणाला की मी तुझ्याशी बोलण्यासाठी इतक्या लांबून आलो आहे आणि तू माझ्या ऐकत नाही त्यावर ते त्याचे एकून खाली बसली तो तिला इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी सांगत प्रेमाच्या गोष्टी करू लागला. ते त्या गर्द झाडीत ते प्रेमी युगल गुटरगु करीत बसले बोलता बोलता त्याने तिचा हात हातात घेतला नंतर एक हा तिच्या गळ्यात टाकला आणि तो तिच्याशी लगट करू लागला. त्याचे ते चाळे बघून कविता म्हणाली **उर्वरीत पान नं. ५ वर...**

# अल्पवयीन मुलगी प्रेमाला भुलली, प्रियकराने तिला गर्भवती करुन सोडली !

**पान नं.४ वरुन** ...की तू माझ्याशी बोलण्यासाठी आला आहेस की ? माझ्या शरीराशी खेळण्यासाठी आला आहेस ? हे सर्व आपण लग्नानंतर करूया परंतु त्याने तिचे काहीं एक न ऐकता तिच्या गळ्यात हात टाकला आणि तिचा किस घेतला. त्यामुळे कविताला त्याचा राग आला परंतु तो म्हणाला की, अगं राणी मी काही जगा वेगळ करत नाही गं. मी तुझ्याशी लग्न करणार आहे काळजी करू नकोस असे म्हणून त्याने पुन्हा तिला पकडले व तिचे तो किस घेऊ लागला आता तीही त्याला प्रतिसाद देऊ लागली किस घेत असताना त्याचा एक हात त्याच्या तिच्या सर्वांगावरुन छातीवरून फिरू लागला होता तो आता कामातुर झाला होता त्याने तिला खाली झोपवले ती त्यासाठी तयार नव्हती. ती म्हणत होती की मला हे आवडत नाही. आपण हे सर्व लग्नानंतर करू या परंतु त्याने तिचे काही न ऐकता बळजबरीच खाली झोपवले आणि तिचे अंगावरील कपडे सारून तिच्या तोंडावर हात ठेऊन तिच्या मनाविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. थोडा वेळ तो तिच्या शरीराशी खेळल्यानंतर त्याची काम वासना शांत झाली. तो तिच्यापासून बाजूला झाला. त्याला जे हवं होत ते त्यानं मिळवलं होत. मात्र कविता रडत होती कारण तिला संभोगामुळे त्रास होऊ लागला होता. धीरज मात्र तिला समजावत होता तो म्हणत होता की, पहिल्या वेळेस असं होत असतं काळजी करू नकोस असे म्हणून त्याने तिला शांत केले. दुपार संपून सायंकाळचे चार वाजले होते. त्याला जे होते ते त्याने प्राप्त केले होते आणि कविताचे मनही वळवले होते. कविता पण त्याच्या मनासारखी वागू लागली होती. कारण तिला वाटत होते की धीरज आपल्याशी लग्न करणार आहे. तो तिला म्हणाला की राणी तुला सोडून जायची इच्छा होत नाही परंतु जावं लागेल. मी लवकरच तुला भेटायला येईल काळजी करू नकोस.मला तुझी खूप आठवण येईल.तुला पण माझी आठवण येईल ना गं ?असे गॉड गॉड बोलून त्याने तिला मनवले. त्या दोघांनी प्रेमाच्या आणा भाका दिल्या व एकमेकाला साथ देण्याचे वचन देऊन धीरज तिला घेऊन रिक्षाने रेल्वेस्टेशनकडे निघाला. ज्या ठिकाणी कविता राहत होती. त्याच्या थोड्या अंतरावर ती म्हणाली की ,तू मला इथेच सोड मी इथून घरी जाईल आणि तिथे कविता उतरली आणि तिथून घरी गेली. तर रिक्षा घेऊन धीरज स्टेशन कडे निघाला. दुसऱ्या दिवशी धीरजने कविताला फोन केला तेव्हा कविता म्हणाली की, धीरज मी तुझ्यावर विश्वास ठेवला होता. तुझ्या सोबत फिरायला आली होती, पण तु योग्य केले नाहीस माझ्या मनाच्या विरुद्ध तू माझे कौमार्य भंग केले. त्यावर तो म्हणाला की कविता तू काळजी करू नकोस गं, आणि एक लक्षात ठेव तुझ्या माझ्या प्रेमाबद्दल कोणाला आत्ताच काही बोलू नकोस .कारण तू अजून कायद्याने सज्ञान झालेली नाही तू अठरा वर्षाची पूर्ण झाली की,मी तुझ्याशी लग्न करेल त्यावर पुन्हा कविता ने त्याच्यावर विश्वास ठेवला ती म्हणाली की ठीक आहे. मी जशी अठरा वर्षाची होईल तसे तुला कळवेल आणि आपण लग्न करून बिहारलाच सेटल होऊ.आता जवळ जवळ कविता व धीरज यांना भेटून, फिरायला जाऊन पाच महिने झाले होते. यादरम्यान धीरज व कविता हे एक मेकांशी फोनवर बोलत असत परंतु कविता आता टेन्शनमध्ये आली होती नऊ जानेवारी २०२३ रोजी धीरजशी बोलताना ती म्हणाली की धीरज तू व मी भेटलो आणि आपल्या मध्ये शारीरिक संबंध प्रस्थापित झाले होते त्यानंतर माझे पाळी आलीच नाही. त्यामुळे मला भीती वाटत आहे , हे ऐकून धीरज सुद्धा घाबरला आणि तो तिला म्हणाला की, कविता तू एक काम कर मेडिकल मध्ये जा आणि प्रेगान्यूज घेऊन ये व चेक कर प्रेग्नेंसी आहे का ते बघ? आणि मला कळव हे ऐकून कविताने मेडिकलमध्ये जाऊन प्रेगा न्यूज आणले व तिने चेक केले असता ती टेस्ट पॉझिटिव्ह आल्याने कविता गरोदर असल्याचे तिला समजले. ती खूप घाबरली आणि तिने लगेच धीरज ला फोन केला ती म्हणाले की प्रेगा न्यूज पॉझिटिव्ह आली आहे आणि मी गरोदर आहे. हे ऐकताच धीरज म्हणाला की तू गरोदर आहे हे कुणालाच सांगू नको तू लगेच दवाखान्यात जा तुझे वय जास्त आहे असे सांग आणि गर्भपात करून घे, असे म्हणून त्याने फोन ठेवला धीरजचे बोलणे ऐकून कविता खूपच घाबरली. आता काय करावे आपण तर गरोदर आहोत आणि आपल्याला गर्भात करून घेण्यासंदर्भात धीरज सांगत आहे. काय करावे आता हे तिला सुचत नव्हते. काही दिवसानंतर तिला उलट्या होऊ लागल्या वारंवार उलट्या होत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले तिची आई कविताला म्हणाली की कविता तुला उलट्या का होत आहेत ?त्यावर तिने थातूरमातूर उत्तर दिले परंतु वारंवार उलट्या होत असल्याने कविताच्या आईच्या काळजात धस्स झाले.तिने तिला गोड बोलून विचारले की, कविता बेटा काय झाले आहे ?त्यावर कविता रडू लागली कविता का रडत आहे. हे तिच्या आईच्या लक्षात येत नव्हते तिच्या आईने तिला विश्वासात घेत विचारले की काय झालं आहे तुला कुणी फसवलं का ? तुझ्या सोबत काही वाईट घडलं का? आम्ही तुझ्या सोबत आहोत काळजी करू नकोस हे ऐकून कविताला खूप रडायला आल्याने ती खूप रडू लागली. कविताच्या आईने तिला शांत केले व म्हणाली की ठीक आहे काळजी करू नकोस मी बाबांना फोन करते सर्व काही ठीक होईल. तिने तिच्या बाबांना फोन केला आणि सांगितले की तुम्ही ताबडतोब घरी या कविताला बरे वाटत नाही. आपल्याला दवाखान्यामध्ये जायचे आहे मुलीला बरे नसल्याचे ऐकून तिच्या वडिलांना तिची चिंता वाटू लागली आणि ते तात्काळ घरी आले घरी आल्याबरोबर कविताची आई तिच्या नवऱ्याला म्हणाली की तुम्ही थांबा थोडा वेळ मी कविताशी बोलते काय झाले आहे ते त्यानंतर तिने पुन्हा कविताला विचारले की बाळा काय झाले आहे तू मला सांग काळजी करू नकोस काही झाले तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत आईने दिलेला दिलेला धीर बघून ती पुन्हा व ओक्साबक्षी रडू लागली.तिने घडलेला प्रकार सर्व आईला सांगितला ते ऐकून तिच्या आईच्या पायाखालची जमीनच सरकली. मुलगी गरोदर असल्याचे ऐकून तिला काय करावे हे समजत नव्हते. कविता च्या आईने तिच्या पतीला सांगितले की,आपल्या मुली सोबत आपल्या गावाकडे मुलाने गैर कृत्य केले असल्याने ती गरोदर आहे असे ती सांगत आहे . हे ऐकून ते म्हणाले की ठीक आहे. आता आपल्याला हिच्या पोटात का दुखत आहे आणि ला उलट्या का होत आहे हे समाजासाठी तिला डॉक्टरकडे नेणे गरजेचे आहे असे म्हणून त्यांनी जवळच असलेल्या एका डॉक्टर कडे नेले. त्यांनी तिला तपासले आणि ते म्हणाले की या मुलीचे लग्न झाले आहे का ?त्यावर तीचे लग्न झाले नसलेचे डॉक्टरांना समजताच हिला तुम्ही आता ताबडतोब छाया हॉस्पिटल येथे घेऊन जा हि मुलगी प्रेग्नेंट आहे असा सल्ला दिला. तिला घेऊन ते अंबरनाथ पश्चिम येथील छाया हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारा कामासाठी नेले. हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर तेथील ड्युटीवरील डॉक्टरांनी कविताला तपासून त्यांच्या लक्षात आले की, ही मुलगी गरोदर आहे म्हणून त्यांनी पुढील उपचारासाठी तिला ताबडतोब तिला कळवा हॉस्पिटल येथे घेऊन जा असे तिच्या आई वडिलांना सांगितले की तेथून तिच्या आई वडिलांनी कविताला रिक्षाने छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा येथे नेले.तिथे गेल्यानंतर त्यांनी डॉक्टरांना सांगितले की, या मुलीला उलट्या होत आहे आणि तिच्या पोटात दुखत आहे. तेथील डॉक्टरांनी कविताला ऍडमिट करून घेतले आणि तिच्यावर उपचार सुरू केला तिची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी तिच्या आई-वडिलांना सांगितले की, ही मुलगी पाच महिन्याची गरोदर आहे . हे ऐकून तिच्या आई-वडिलांवर डोंगरच कोसळला होता त्यांनी डोक्याला हात लावला तात्काळ त्यांनी कविताला सांगितले की तू त्या हातरामखोर धीरजला फोन कर आणि सदर प्रकार सांग मग कविताने धीरजला फोन केला रिंग वाजत होती पण तिकडून धीरज फोन उचलत नव्हता. खूप वेळा फोन करूनही तो उचलत नसल्याने ती चिंताग्रस्त बनले होती. तिला जेव्हा रुग्णालयात दाखल केले तेव्हा तिला तेथील डॉक्टरांनी ती अनैतिक शारीरिक संबंधातून गरोदर असल्याचे उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यास सांगितले परंतु तिथे ड्युटीवर असलेल्या पोलीसांने तिला विचारले असता तिने धीरजच्या विरुद्ध तक्रार दिली नाही कारण तिला वाटत होते की धीरज हा तिचा व तिच्या बाळाचा स्वीकार करेल . परंतु कविता ऍडमिट होऊन ५/६ दिवस झाल्या नंतरही धीरजने तिच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही व उत्तर दिले नाही त्यामुळे तिला कळून चुकले होते की , धीरजने आपल्याला प्रेमाच्या नावाखाली फसवले असून आपला उपभोग घेतला आहे व फसवले आहे म्हणून तिने तात्काळ ती त्याच्या विरुद्ध तक्रार दाखल करण्याचे ठरवले. सदर प्रकार हा शिवाजीनगर अंबरनाथ पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये घडला असल्याने तात्काळ कविताला घेऊन तिचे आई वडील पोलीस स्टेशनला पोहोचले व घडलेला प्रकार सांगितला व.पो.निरी. यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी स.पो.निरी.सुप्रिया देशमुख यांनी तात्काळ तिच्या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद केली. कविताने धीरजला कळविले होते की ती त्याच्यापासून पाच महिन्याची गरोदर आहे परंतु त्याने तीची काळजी न करता तिला धमकावत गर्भात करून घेण्याचे घेण्यास सांगितले यावरून त्याने तिची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाल्याने कविताने धीरज देवराज चंद्रवंशी वय २२ वर्ष राहणार सासाराम, जिल्हा रोहतास राज्य बिहार याचे विरुद्ध कायदेशीर तक्रार नोंदवली.

शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच उल्हासनगर परिमंडळ -४ चे डीसीपी व अंबरनाथ विभागाचे एसीपी आणि वपोनिरी. यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक नेमण्यात आले त्यात पो. उप. निरी . शेख ,पो.हवा. केणे ,पवार हे बिहार येथे जाऊन गेले त्यांनी धीरज देवराज सूर्यवंशी, वय २२,रा. सासाराम जि.रोहतास राज्य बिहार येथून धीरजला बिहार मधून पकडून पोलीसांनी कोर्टात हजर केले असता त्याला आठ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. यांच्या विरुद्ध भा.दं.वि.कायदा कलम ३७६ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

सदर गुन्ह्या संदर्भात उल्हासनगर परिमंडळ-४ चे डीसीपी व अंबरनाथ विभागाचे एसीपी तसेच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास तपासाधिकारी स.पो.निरी. सुप्रिया देशमुख करीत आहे.

## एकतर्फी प्रेमातून प्रियकराने तीन मित्रांसह केला बलात्कार !

**पान नं ७ परुन...** आली नसती.यासाठी घरातील कुटुंबातील आई-वडिलांनी मुलगा असो किंवा मुलगी त्यांना बलात्कार म्हणजे काय त्यानंतर त्यांच्या आयुष्याची माती कशाप्रकारे होऊ शकते त्यांच आयुष्य कसं उध्वस्त होऊ शकतं याची माहिती देणे गरजेचे आहे. मुलांशी किंवा मुलीशी पाल्य न समजता मित्रा प्रमाणे जर आपण वागलात तर असे प्रकार घडणार नाही असे तज्ञांचे म्हणणे आहे.मुलंही पालकांसोबत फ्री माईंड असेल तर त्यांच्या हातून गुन्हा घडण्याचे चान्सेस झिरो परसेंट असल्याचेही एका पाहणीत समोर आले आहे.शिक्षणा बरोबर जनरल नॉलेज सुद्धा गरजेचे आहे परंतु अशा घटनांमध्ये मुलींचे आयुष्य उध्वस्त होते. ज्या मुलांना शारीरिक आकर्षण असते परंतु कायद्याचे नॉलेज नसल्याने त्यांना अंधार कोठडीत जाऊन आपल्या आयुष्याची माती करून कुटुंबाच्या स्वप्नांचा चक्काचूर होतो. सुनिता ही १९ तारखेला घरातून बाहेर गेली ती परत आलीच नाही आणि त्यानंतर एक रात्र तिच्या मित्राकडे थांबली आणि त्याने तिच्यावर बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी ती कुर्ला येथे गेली तिथे रात्रभर राहिली.नंतर दुसऱ्या दिवशी कल्याणला आली पुन्हा ती त्याच्या मित्राकडे गेली आणि रात्रभर त्याने तिला ठेवून घेतले तिच्यावर रात्रभर त्यामित्रांसह चौघांनी बलात्कार केला. एवढे होऊन सुद्धा तिने पोलिसांना काही सांगितले नाही जर सुधारगृहात व सीडब्ल्यूसीच्या महिला अधिकाऱ्यांनी तिच्याकडून माहिती जाणून घेतली नसती तिला विश्वासात घेतले नसते तर सदर घटना उघडकीस आली नसती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.साहिल राजभर वय वर्ष १८,याचे वडील व आई फुलं हार विक्री करतात आणि फुल विक्रीतून आलेल्या पैशातून ते घर खर्च भागवून साहिलला शिकवत होते.तो यावर्षी बारावीला शिक्षण घेत होता तर विजय बेरा वय वर्षे २१,हा एसवाय अर्थात चौदावीला महाविद्याल याच्या दुसऱ्या वर्षाला तो शिक्षण घेत आहे तर सुजल गवळी वय वर्ष २० हा सुद्धा महा विद्यालया च्या दुसऱ्या वर्षाला शिकत आहे .यातील एक अल्पवयीन मुलगा वय वर्ष १७ असून तो अकरावीत शिकत आहे.यातील अल्पवयीन असलेला मुलगा याला वडील नाही फक्त आई व बहीण आहे .आई ही धुणी भांडी करून घर खर्च भागवत असते आणि मुलाला शिकवून मोठा करून त्याला त्याच्या पायावर उभे करावे यासाठी धडपडत होती परंतु वाईट संगतीमुळे तो वाया गेला आणि त्याच्या आतून मोठा गुन्हा घडला.

या गुन्ह्यासंदर्भात पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, परिमंडळ ३ , चे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, कल्याण विभागाचे एसीपी उमेश माने पाटील यांच्या मार्गदर्शना खाली कोळशेवाडी पोलीस ठाण्याचे व. पो.नि.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी पो.उप.निरी.दत्तात्रय गोडे यांनी एपीआय बोचरे एपीआय पगारे,एपीआय डोके रायटर बी.व्ही. शेंडगे यांच्या मदतीने तपास केला.

# कोंबड्या चोरांनी पाठलाग करणाऱ्या विनयचा केला निर्घृण खून !

**पान नं.१ वरून...**विनय विनोद पाटील, वय वर्ष १९हा शिवकर गावात आपल्या आई,वडील व बहिणी सह राहायला होता. तो झाडा वरून नारळ काढणे, झाडे तोडणे अशी लहान सहान कामे करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत होता.त्या रात्री त्याच्या बहिणीला जाग आली असता तिला तिचा भाऊ विनय हा घरात झोपलेला दिसला नाही. तो बाहेर कुठे लघु शकेसाठी गेला असावा असे समजून ती पुन्हा झोपली परंतु बराच वेळ झाला तरी भाऊ परत कसा आला नाही म्हणून तिने तिच्या वडिलांना उठवले व म्हणाली की, बाबा विनय भाऊ केव्हाचाच घरात दिसत नाही, तो कुठे गेला असेल एवढ्या रात्री हे ऐकून त्याचे वडील उठले आणि त्याचा शोध घेण्यासाठी घराबाहेर आले परंतु बाहेर शोधाशोध करूनही तो सापडला नाही म्हणून त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने त्याचा शोध सुरू केला. ते त्याला शोधत शोधत गावा जवळच असलेल्या मोर्म्युला तलावाच्या गणपती घाटाजवळ आले. कदाचित तो इकडे आला असावा असे म्हणून ते त्याला शोधू लागले असता त्या ठिकाणी विनय हा त्यांना रक्त बंबाळ अवस्थेत दिसून आला. विनय च्या वडिलांनी टाहो फोडत ते त्याच्या जवळ गेले. त्याच्या शरीरावर विविध ठिकाणी धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याचे त्यांना दिसले. सदर बाब वाऱ्यासारखी गावात पसरली आणि त्या ठिकाणी बघ्यांनी गर्दी केली. तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्यात दक्ष नागरिकाने ही बातमी कळविली असता लगेच पनवेल शहर पोलीस पथक त्या ठिकाणी पोहेचले. नवी मुंबई पोलीस आयुक्ताल याच्या कार्यक्षेत्रामध्ये शिवकर गाव येते. या ठिकाणी पोलीसांनी मयत तरुणाचे नाव, गाव याची चौकशी केली असता मयत तरुणाचे नाव विनय विनोद पाटील वय वर्षे १९ राहणार शिवकर गाव असे समजले. विनयच्या शरीरावर अज्ञात इस्मानी धारदार हत्यारांनी त्याच्या शरीरावर अत्यंत क्रूरपणे वार करून त्याचा खून केला असल्याचे दिसत होते.

सदर घटनेची माहिती तात्काळ पनवेल शहर पोलीस स्टेशनचे व. पा.निरी.यांनी वरिष्ठांना कळविली.सदर घटनेची माहिती पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय मोहिते, यांना समजली असता त्यांच्या मार्गदर्शनाखाली डिसीपी अमित काळे, एसीपी विनायक वस्त घटनास्थळी पोहेचले.घटनास्थळाचा व मयताचा इनक्वेस्ट पंचनामा करून त्याचे शव उत्तरीय तपासणीसाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात पाठवून देण्यात आले. सदर घटनेच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१५/२०२३ भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२ अन्वये अज्ञात इसमां विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर घटनेची माहिती मिळताच त्या ठिकाणी कक्ष-३ गुन्हे शाखेचे पोलीस पथक घटनास्थळी पोहेचले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर आरोपींचा शोध घेण्याबाबत समांतर तपास सुरू करण्यात आला.सदर तरुणाच्या खूनामुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन हळहळ व्यक्त करण्यात येत होती. कक्ष - ३ च्या तपास पथकाने तपास आरंभला व शिवकर गाव तसेच परिसरामध्ये त्यांच्या खबऱ्यांना कामाला लावले तसेच त्या परिसरामध्ये असलेल्या संशयित वस्तू त्याच बरोबर सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तांत्रिक तपासा दरम्यान गुप्त खबऱ्यांच्या मदतीने आरोपी बाबत काही माहिती मिळते का याचा तपास सुरू करण्यात आला.मयत विनय विनोद पाटील याच्या खुनाचे काय कारण असू शकते. याबाबत अधिक माहिती घेतली असता पोलीसांना समजले की, विनयचे गावात व परिसरामध्ये कोणासोबतही भांडण नव्हते तो सर्वांशी मिळून मिसळून वागत होता. त्यामुळे त्याचा कोणी व का खून केला असावा ? हा प्रश्न पोलीसांना पडला होता. पोलीसांना कोणत्याच प्रकारे धागेदोरे मिळून येत नव्हते. गुन्हे शाखेचे पोलीस पथक वारंवार घटनास्थळ व परिसर पिंजून काढत होते. शिवकर गावामध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व पाऊलवाटा, मार्ग याची त्यांनी माहिती घेतली. तसेच स्थानिक रहिवासी यांच्या कडेही पोलीसांनी माहिती घेऊन तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला तेव्हा पोलीसांना गुप्त खबऱ्याने माहिती दिली की, सदर घटनेच्या दिवशी उसर्ली गावातील ३ तरुण हे शिवकर गावामध्ये आले होते आणि त्यांनीच विनयचा खून केला आहे. सदर माहिती मिळताच पोलीस पथक उसर्लीगाव, ता. पनवेल, जि.रायगड या ठिकाणी पोहचले. आणि त्यांनी शिताफीने तीन संशयित तरुणांना पकडून पोलीस ठाण्यात आणले आणि त्यांच्याकडे विनयच्या खुनाबाबत चौकशी आरंभली असता ते ताकास तूर लागू देत नव्हते परंतु पोलीसांनी केलेल्या तपासात विनयच्या खूनामध्ये हे तीन तरुण असल्याची खात्री त्यांना झाली होती. एवढेच नव्हे तर ज्या दिवशी घटना घडली होती त्या दिवशी त्या गावांमध्ये तीन जण चोरी करण्याच्या उद्देशाने आले होते ?त्यांनी आजूबाजूच्या परिसरात असलेल्या घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या.इतकी माहिती पोलीसांना मिळाली होती .

पोलीसांनी या तिघा तरुणांकडे चौकशी केली असता पोलीसांना त्यांची नावे समजली यातील १) दिनेश कुमार भैय्यालाल सरोज वय वर्ष १९, सध्या राहणार समर्थ इंटरप्राईजेस, उसर्ली गाव, ता.पनवेल, जि.रायगड हा मुळ राहणारा मोईनुद्दीनपूर ,जिल्हा कौसंबी ,राज्य उत्तर प्रदेश तर, २) वीरेंद्रकुमार रामदुलारे सरोज वय २१ वर्षे राहणार समर्थ इंटरप्रायजेस उसर्ली गाव तर हा मूळ राहणारा जवाई,पोस्ट सराय, आखित, थाना, मंझनपुर, जि. कौसंबी राज्य उत्तर प्रदेश ३) चंद्रशेखरकुमार लालजी वय वर्ष २२राहणार समर्थ इंटरप्राईजेस उसर्ली गाव हा राहणार कसेंदा, थाना पिंपरी, जिल्हा कौसंबी राज्य उत्तर प्रदेश असे असल्याचे समजले.

हे तीनही संशयित आरोपी त्यातील दिनेश कुमार भैय्यालाल सरोज वय वर्ष १९ हा चार वर्षापासून समर्थ इंटरप्राईजेस उसर्ली गाव या ठिकाणी व्यवसाय करतो. याचे वडील खुनाच्या गुन्ह्यामध्ये मध्ये अटकेत होते अशी माहिती पोलिसांना प्राप्त झाली आहे.यातील वीरेंद्र कुमार रामदुलारे सरोज वय वर्ष २१, हा सुद्धा समर्थ इंटरप्राईजेस उसर्लीगाव येथील बेकरी मध्ये सुमारे दीड वर्षापासून कामात आहे तर चंद्रशेखरकुमार लालजी वय वर्ष २२ हा सुद्धा समर्थ इंटरप्राईजेस उसर्ली गाव येथील बेकरीमध्ये सुमारे दीड वर्षापासून कामाला आहे.

शिवकर गावातील विनयचा खून झाल्याची माहिती पोलीसांना मिळताच तात्काळ कक्ष ३ गुन्हे शाखेकडून घटनास्थळाची पाहणी करून अज्ञात आरोपींचा समांतर तपास सुरु करण्यात आला.कक्ष ३ च्या तपास पथकाने १५ ते २०साक्षीदार तसेच घटनास्थळ व परिसरामध्ये मिळून आलेल्या संशयित वस्तू , सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास, गोपनीय बातमीदार यांच्या सहाय्याने आरोपींची माहिती मिळवली. पोलीसांना मयताच्या खूनाचे कारण तसेच आरोपींबाबत उपयुक्त माहिती मिळून येत नसल्याने कक्ष ३च्या तपास पथका ने दिवस रात्र घटनास्थळ व परिसर पिंजून काढला परिसरातील येण्या जाण्याचे मार्ग व पाऊलवाटांची माहिती घेऊन स्थानिक रहिवासी यांच्याकडून माहिती घेऊन तपास केला होता. पोलीसांना खबऱ्या कडून तपासा दरम्यान शिवकर गावा मध्ये घटनेच्या रात्री चोरी करण्यासाठी काही इसम आले होते त्यांनी काही रहिवाशांच्या घराला बाहेरून कड्या लावल्या होत्या अशी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. या गुन्ह्यातील फिर्यादी यांच्या घरातून या संशयित आरोपींनी मोबाईल ची चोरी केली असल्याचे सुद्धा पोलीसांना समजले.

सदर आरोपी हे शिवकर गावा मध्ये कोंबड्या चोरी करण्यासाठी आले होते .विनयच्या घरी त्याने कोंबड्या पाळल्या होत्या चो जेंव्हा कोंबड्या नेण्यासाठी आले तेंव्हा कोंबड्या ओरडू लागल्या त्यांच्या आवाजाणे विनय जागा झाला कोंबड्या का ओरडताहेत हे पाहण्यासाठी विनयचे वडील बाहेर आले त्याने त्या कोंबड्या घाटात घेतल्या पण दरवाजा लावायला तो विसरले. त्यावेळी चोरांनी थोड्या वेळाने विनयच्या घरात प्रवेश केला. त्यांनी घरातील मोबाईल व पैसे घेतले तेव्हढ्यात विनयला जग आली तो उठताच चोरांनी पळ काढला. त्यांच्या मागे विनय त्यांना पकडायला गेला . चोरांनी काही रहिवाशांच्या घराला बाहेरून कड्या लावल्या होत्या व त्यांनी काहींच्या घरातून किमती वस्तू मोबाईल साहित्य असे चोरून त्यांनी पळ काढला होता परंतु ते पळून जात असताना मयत असलेल्या विनयने त्यांना बघितले व आपल्या घरातून व गावातून हे चोर चोरी करून जात आहे, असे त्याच्या लक्षात आले असता तो त्यांच्या मागे मागे त्यांना पकडायला गेला. कुणीतरी पाठलाग करीत असल्याचे त्या तिघही चोरांच्या लक्षात आले आणि त्यांनी मागचा पुढचा विचार ना करता विनयला पकडले आणि त्याचे तोंड दाबून त्याला मारहाण केली. संशयित आरोपींनी त्याला कुऱ्हाडीने व चाकूने गंभीर दुखापत केली विनय व चोरांमध्ये झटापट झाली. चोरांनी त्याला ओढत ओढत मुंबई पुणे एक्सप्रेस वे च्या ब्रिजच्या खाली रोडालगत झाडाझुडपात नेऊन तिथे त्याला मारून टाकले अशी माहिती तपासात समोर आली.

सदर गुन्ह्याचा तांत्रिक तपासाच्या व गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अत्यंत कौशल्य पूर्व सखोल पद्धतीने विचारपूस तंत्राचा परिपूर्ण वापर करून संशयित इसमांचा पोलीसांनी तपास केला.

यावेळी सदर गुन्ह्याच्या अतांत्रिक तपासामध्ये असलेल्या सुमारे दीड लाख मोबाईल नंबरच्या हालचाली दिसून आल्या होत्या. त्याबाबत सखोल तपास पोलीसांनी केला व त्यातून १५० संशयित मोबाईल क्रमांक धारकांची माहिती पोलीसांनी पडताळून पाहिली दरम्यान अंतिम टप्प्यांमध्ये फक्त पंधरा मोबाईल धारकांना पडताळले असता तीन इसमांकडे अत्यंत कौशल्यपूर्वक व सखोल पद्धतीने विचारपूस करून तंत्राचा परिपूर्ण वापर करून चौकशी केली आणि या गुन्हयाचा पोलीसांनी ४८ तासात छडा लावला.घटना स्थळावरून गुन्ह्यात वापरलेली कुर्हाड व चाकू पोलिसांना मिळून आला .

त्यातील तीनही आरोपींनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली व आपण पकडले जाऊ नये म्हणून त्यांनी विनयचा खून केल्याचे पोलीसांना सांगितले. सदर गुन्हा मध्ये पोलीसांनी तीनही आरोपींना कोर्टात हजर केले असता त्यांना कोटीने तीन दिवसाची पोलीस कोठडी कोर्टाने सुनावली. सदर खूनाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात. संशयित तीनही आरोपींनी विनय पाटील चा खून हा फक्त आपली चोरी उघड होऊ नये व आपण पकडल्या जाऊ नये याच कारणातून केला असल्याचे स्पष्ट झाले आहे.घटनेच्या रात्री या तिघांनी दारू पिली होती यापूर्वी सुद्धा संशयित आरोपींनी काही ठिकाणाहून कोंबड्या चोरल्या तर गुटका चोरी व अशा असून लहान सहन चोऱ्या त्यांनी केल्या असल्याचे पत्रकार परिषदेत डीसीपी अमित काळे यांनी सांगितले.

सदर गुन्ह्या संदर्भात नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमित काळे व सहायक पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे कक्ष-३ चे व.पा.निरी. विश्वनाथ कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली एपीआय सागर पवार, ईशान खरोटे, पो.उप.निरी. सुशील मोरे, एएसआय सचिन सुभे, पो. हवा. प्रकाश मोरे, प्रवीण बावा ,कृष्णा मोरे ,महिला पोलीस हवालदार अनिता पवार ,सुधीर पाटील, महेंद्र पाटील, चेतन जेजुरकर , सचिन धनवटे, किशोर बोरसे, दिनेश जोशी ,पोलीस नाईक राजेश मोरे ,तुकाराम सोनवलकर यांनी तपास कामी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

असून पुढील तपास पनवेल शहर पोलीस स्टेशनचे व.पो.निरी. विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

★★★

# एकतर्फी प्रेमातून प्रियकराने तीन मित्रांसह केला बलात्कार !

**पान नं.१ वरुन...** त्यानुसार मिसिंग तक्रार क्रमांक ३६३/२०२३ प्रमाणे नोंदवून घेतली. पोलीसांनी तात्काळ त्या मुलीचे नाव, गाव, पत्ता, वय याची सर्व नोंद करून घेतली आणि सांगितले की, त्या मुलीचा एक फोटो आणून द्या,तेवढ्यात ते म्हणाले की, साहेब आम्ही फोटो आणलेला आहे असे म्हणत त्यांनी तिचा एक फोटो दिला. पोलीस म्हणाले की, तुम्ही आता घरी जा व तुमच्यापरीने तिला शोधा. आम्ही आमच्या परीने शोधतो आणि जशी ती आम्हाला सापडली की, तसे तुम्हाला फोन करतो, आणि जर का तुम्हाला ती सापडली तर तुम्ही आम्हाला फोन करा एवढे सांगून त्यांनी त्या मुलीच्या आई वडिलांना घरी पाठवले. इकडे व. पो. निरी.देशमुख यांनी ताबडतोब डिटेक्शन ब्रांच चे एपीआय बोचरे ,एपीआय गोडे, एपीआय पगारे ,एपीआय डोळे या सर्वांना बोलावले आणि त्यांना सदर मुली बाबत माहिती दिली व ताबडतोब त्या मुलीचा शोध घेण्याचे आदेश दिले.त्यानुसार पोलीसांनी आपापल्या खबऱ्यांना कामाला लावले आणि त्या मुलीच्या मित्र-मैत्रिणीकडे तपास आरंभला तेव्हा त्या मुलीचा एक मित्र भेटला. पोलीसांनी त्याला विश्वासात घेतले आणि म्हणाले की तुझी मैत्रीण हरवली आहे तिच्या जीवाचे काही बरे वाईट होऊ नये असे तुला वाटत असेल तर तू आम्हाला मदत कर. तेव्हा तो मुलगा म्हणाला की ,साहेब मी तुम्हाला माझ्या परीने जी होईल ती मदत करेल मग पोलिसांनी त्याला त्या मुलीशी फोनवरून संपर्क साधायला लावला. त्याने सुनिताला फोन लावला तेव्हा तिने तो फोन उचलला व ते म्हणाली की बोल संदेश काय काम आहेस तेव्हा तो म्हणाला की, सुनिता अगं तू कुठे आहेस तू? मला तुझ्याशी काम आहे, तेव्हा ती म्हणाले की, मी कुर्ला येथे माझ्या मैत्रिणीकडे आलेली आहे. तेव्हा तो म्हणाला की तू केव्हा येणार आहेस त्यावर ती म्हणाले की मी यायच्या वेळेस तुला फोन करेल आणि तिने फोन ठेवून दिला पुन्हा थोड्यावेळाने त्याने फोन लावला तेव्हा ती म्हणाली की मी सकाळी कल्याणला येईल तेव्हा तू मला भेट मग ती मुंबईहून कल्याणला आली आणि कल्याणला आल्यावर ती तिच्या मित्राला भेटली तेवढ्यात त्या मित्राने पोलिसांना इशारा केला पोलिसांनी ताबडतोब वेळ न दवडता तिला ताब्यात घेतले आणि पोलीस स्टेशनला आणले. तिच्याकडे पोलिसांनी चौकशी केली की तू कुठे गेली होतीस ?आणि का गेली होतीस? तुझ्यासोबत काही बरे वाईट घडले का? तेव्हा ती म्हणाली की माझ्यासोबत काहीही बरे वाईट घडलेले नाही आणि मी स्वत:हून बाहेर माझ्या मैत्रिणीकडे कुर्ला येथे गेली होती.माझी कोणाबद्दलही काहीही तक्रार नाही असे तिने सांगितले पोलिसांनी व महिला पोलीस अधिकारी यांनी तिच्याकडे खूप खोदून खोदून विचारले परंतु ती कुठल्याही प्रश्नाचे उत्तर योग्य प्रकारे देत नव्हती.त्यामुळे पोलिसांनी तिला सुधारगृहात पाठवण्याचा निर्णय घेतला आणि तिला भिवंडी येथील सुधारगृहात तिला पाठवून देण्यात आले. सुधारगृहातून आल्यानंतर तिच्याकडे अधिक चौकशी केली असता तीने इयत्ता दहावीची परीक्षा दिली असल्याचे सांगितले तेथील महिला अधिकाऱ्यांनी तिच्याकडे कसून चौकशी केली आणि तिला उल्हासनगर येथील सीडब्ल्यूसी कडे पाठवण्यात आले.या ठिकाणी मात्र पुन्हा तिच्याकडे अधिक चौकशी करण्यात आली .तिचा विश्वास संपादन करण्यात आला आणि ती धाय मोकलून रडू लागली आणि एक मोठा गुन्हा घडतीस आला.ती म्हणाली की , मी माझ्या मित्रावर विश्वास ठेवून त्याच्या रूमवर गेली होती तेव्हा त्याने माझ्यावर बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले व रात्रभर डाबून ठेवत बलात्कार केला.दुसऱ्या दिवशी त्याने मला रेल्वे स्टेशनला सोडून दिले मग मी घाबरले होते तिथून कुणाला काहीही न सांगता कुर्ला येथे असलेल्या माझ्या मैत्रिणीकडे गेली. तिथून परत कल्याणला आल्यावर कुठे जावे हे समजत नव्हते आणि पुन्हा मला माझ्या मित्राने बोलावले .तो मला त्याच्या रूमवर घेऊन गेला त्या ठिकाणी थोड्या वेळाने त्याचे तीन साथीदार आले. त्या ठिकाणी माझ्यावर पुन्हा बलात्कार करण्यात आला ही माहिती ऐकताच सी डब्ल्यू सी च्या महिला अधिकाऱ्यांनी तिची विचारपूस करून तिला धीर दिला आणि हे सर्व प्रकरण चौकशीसाठी कोळसेवाडी पोलिसांकडे पाठवून देण्यात आले.आता मात्र कोळसेवाडी पोलिसांना दिशा समजली होती. त्यांनी तिच्याकडे खूप आस्थेवाईकपणे व प्रेमाने चौकशी केली असता तिने सर्व प्रकार सांगितला. ती म्हणाली की साहेब माझा मित्र साहिल राजभर याची व माझी इंस्टाग्राम वरून ओळख झाली होती. आम्ही एकमेकांशी फोनवर बोलत होतो एक दिवस तो म्हणाला की, माझे एका मुलीवर प्रेम आहे परंतु मी तुझ्याशी बोलत असल्याचे तिला समजल्याने ती माझ्यावर नाराज झाली आहे आणि आमचे ब्रेकअप सुद्धा होऊ शकते म्हणून तुला विनंती आहे की, तू माझ्यासोबत चल व तिला भेट आणि तिला सांग की तुझ्यात व माझ्यात कोणत्याही प्रकारचे प्रेम संबंध नाही असे केल्याने पुन्हा ती मला मिळेल व आमचे प्रेम संबंध कायम राहतील हे ऐकून ती म्हणाली की,मला त्याच्याबद्दल सहानु भूती निर्माण झाली व मी त्याच्या सोबत जायला तयार झाले.त्या दिवशी त्याने फोन केल्यावर मी त्याला भेटायला गेली असता तो मला कल्याण रेल्वे स्टेशनवर भेटला म्हणाला की माझी मैत्रीण रेल्वे स्टेशनवर तुला भेटायला आली नाही. ती माझ्या घरी थांबलेली आहे तिला माझ्याबद्दल खूप चीड निर्माण झाली आहे. आपण घरी जाऊ आणि तिच्याशी बोलू तेव्हा ती त्याच्यासोबत गेली.जेव्हा सुनीता त्याच्या उल्हासनगर येथे घरी गेली तेव्हा त्याच्या घरात कोणीही नव्हते तेव्हा तिने त्याला विचारले की तुझ्या घरी कोणीच नाही का? तुझी आई कुठ आहे ? तेव्हा तो म्हणाला की आई बाहेर गेलेली आहे आणि माझी मैत्रीण कदाचित बाहेर गेली असावी थोडा वेळ थांब असे म्हणून त्यांने दरवाजा बंद केला आणि त्याने माझ्या संमती विना मला त्याच्या घरी थांबवले रात्री पर्यंत आम्ही वाट बघितली परंतु त्याची मैत्रीण आली नाही आणि मग त्याने माझ्यावर बळजबरी बलात्कार केला. एवढेच नव्हे तर त्याने मला घरात कोंडून ठेवले व बाहेर जाऊ दिले नाही. रात्रभर त्याने माझ्यावर बलात्कार केला व दुसऱ्या दिवशी मला त्याने कल्याण रेल्वे स्टेशनवर सोडून दिले .झाल्या प्रकाराने ती खूप घाबरून गेली होती आता काय करावे हे तिला समजत नव्हते.म्हणून ती तिच्या एका मैत्रिणीकडे कुर्ला येथे राहते म्हणून तिच्या घरी गेली .तिनं घडलेला प्रकार मैत्रिणीला सांगितला नाही कारण साहिल हा तिचा मित्र होता आणि त्याने विश्वासघात केला होता रात्रभर मैत्रिणीकडे राहिल्यानंतर मी पुन्हा दुसऱ्या दिवशी कल्याणला आली कल्याणला आल्या नंतर काय करावे हे तिला सुचत नव्हते. तेवढ्यात तीला साहिल या मित्राचाच फोन आला व तो म्हणाला की तू कुठे आहेस तेव्हा तिने त्याला सांगितले की मी कल्याण रेल्वे स्टेशनवर आहे तेव्हा तो म्हणाला की झाले गेले विसरून जा काही काळजी करू नको मी तुला घ्यायला येतो आणि आपले प्रेम आहे हे विसरू नको (त्याचे एकतर्फी प्रेम होते असे तीने तपासात सांगितले) असे म्हणून तो तिला घ्यायला आला आणि मग तो तिला घेऊन उल्हासनगर येथे गेला. त्याच्या गल्लीबोळात असलेल्या एका रूमवर तो तिला ला घेऊन गेला. त्या ठिकाणी गेल्यावर त्यांने तिला खायला प्यायला दिले व झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. थोड्या वेळाने त्याचे तीन मित्र आले तेव्हा तो म्हणाला की, हे माझे तीन मित्र आहेत यांना यांच्या मनासारखे करू दे आणि त्यांनी तिच्या सोबत बळजबरीने अनैतिक शारीरिक संबंध प्रस्थापित केले. एवढेच नव्हे तर रात्रभर त्यांनी तिला डांबून ठेवले व आळीपाळीने सतत ते बलात्कार करत राहिले झाल्या प्रकाराने ती फार गोंधळून गेली.आता काय करावे हेच तिला सुचत नव्हते ज्याच्यावर विश्वास ठेवला त्यानेच वाटोळे केले होते. आता घरी काय सांगणार म्हणून कुठेतरी पळून जाण्याचा तिने विचार केला. ती मुंबईला गेल्यावर तिच्या मित्राचा फोन आला आणि ती कल्याणला आली. कल्याणला आल्या नंतर पोलिसांनी तिला पकडले व पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्यांनी तिच्या कडे चौकशी केली असता भीतीपोटी तिने कुणाचेच नाव सांगितले नाही व घडला प्रकारही सांगितला नाही मग तिला पोलिसांनी भिवंडी येथील बालसुधार गृहात पाठवले. तेथून तिला सी डब्ल्यू सी उल्हासनगर कडे पाठवले .त्या ठिकाणी त्यांनी तिच्या कडे चौकशी केली असता तिच्या कडून राहवले गेले नाही आणि तिच्या सोबत जो प्रकार घडला तो सांगितला. हे सर्व ऐकताच पोलिसांनी त्या मुलीला विचारले की तू त्या सर्वांना ओळखतेस का तेव्हा ती म्हणाली की मी साहिल राजभर ला ओळखते.तेव्हा पोलिसांनी साहिल राजभर याचा फोन नंबर घेतला आणि त्याच्याशी संपर्क साधला असता तो म्हणाला की मी वसार या ठिकाणी मी माझ्या मित्राकडे आलो आहे. काय काम आहे? त्यावर पोलीस म्हणाले की काही नाही तुला भेटायचे होते तुझ्याकडे काम आहे तेव्हा त्याला समजून चुकले की काहीतरी गडबड आहे सुनिताने पोलीस कंप्लेंट केली असावी म्हणून त्याने फोन स्विच ऑफ केला इकडे कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या चार टीम त्याच्या ला शोधार्थ निघाल्या. पोलिसांनी मलंगगड डोंगर पायथ्याशी असलेल्या वसार गावातून साहिलला ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता तो उडवा उडवी चे उत्तर देऊ लागला आणि त्याला पोलिसांनी खास पोलीस खात्या दाखविला असता तो म्हणाला साहेब होय माझ्याकडून चूक झाली मी सुनीतावर बलात्कार केला तेव्हा पोलीस म्हणाले की तू तर केलाच आहे परंतु तुझे तीन साथीदार कुठे आहे त्यांनी पण बलात्कार केला आहे.त्यां सर्वांचे नाव व पत्ते सांग तेव्हा त्याने विजय बेरा व सुजल गवळी व एक अल्पवयीन असलेल्या मुलाचे नाव सांगितले पोलिसांनी तात्काळ उल्हासनगर,अंबरनाथ,बदलापूर,कल्याण डोंबिवली, पनवेल असा परिसर पिंजून काढला आणि या तिघांनाही पकडून पोलीस ठाण्यात आणले त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. यातील साहिल राजभर वय वर्ष १८, विजय बेरा वय वर्ष २१, सुजल गवळी वय वर्ष २०अ आणि एक अल्पवयीन असलेला मुलगा अशा चौंघांवर कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा र.क्र.२५७/२०२३/२०२३ भारतीय दंड विधान कायदा कलम संहिता ३६३, ३७६ (३) ३७६ (ड), ३७६ (ड) , पोक्सो ४,५ जी, ६,८,१२ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करून त्यांना कोर्टात हजर करण्यात आले असता त्यांना सात दिवसाची पोलीस कोठडी कोर्टाने सुनावली. कोठडी दरम्यान पोलिसांनी सखल चौकशी केली असता समजले की, सदर मुलगी ही दहावीत शिकत असतानांच तिला मोबाईलचे वेड होते व ती मोबाईल हाताळत असताना सोशल मीडियावर ॲक्टिव्ह होती. तिची इंस्टाग्राम वर साहिलशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले परंतु साहिलच्या मनासारखे घडून येत नव्हते म्हणून त्याने तिला फसवून तिला घरी बोलावले आणि तिचा विश्वासघात करत तिच्यावर बलात्कार केला. एवढेच नव्हे तर या नराधमाने त्याच्या तिघं मित्रांना सुद्धा बोलावले आणि सुनितासोबत तिच्या मनाविरुद्ध बलात्कार केला.या चारही मित्रांनी कुठल्याही प्रकारच्या परिणामाचा विचार केला नाही किंवा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही की,त्यांच्या घरातील वातावरण हे शैक्षणिक दृष्ट्या सक्षम नसल्याने कायद्याचे त्यांना नॉलेज नसावे व त्यांची संगत सुद्धा चांगल्या मुलांमध्ये नसावी म्हणून त्यांच्या हातून हा गुन्हा घडला. जर त्यांना कोणी सांगितले असते की, तुम्ही असे प्रकार केले तर तुमच्यावर फार मोठी कारवाई होऊ शकते तुम्हाला शिक्षा होऊन तुम्ही जेलमध्ये जाल तर त्यांनी असे धाडस केले नसते शिवाय मुलीचे आई-वडिलांनी जर लक्ष दिले असते आणि तिला मोबाईल दिला नसता तर तिची इंस्टाग्राम व सोशल मीडियावर अशी ओळख झाली नसती तिला सर्वस्व गमावण्याची वेळ त्या कुटुंबावर व तिच्या वर **उर्वरीत पान.नं.५ वर...**



रायटर **बी.व्ही.शेंडगे**



संशयीत आरोपीसमवेत पोलीस पथक

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना

**मुंबई** : बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियमानुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलां- मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणण्यासाठी राज्यात बालसंगोपन योजना सुरु करण्यात आली होती.ही योजना संस्थाबाह्य योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलामुलींना थेट पर्यायी कुटूंबात संगोपनाकरिता ठेवता येते. अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले या योजनेचा लाभ घेतात राज्यामध्ये कोविडमुळे पालक मृत पावल्याने अनाथ झालेल्या बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या असंख्य असल्याने एकाच कुटुंबातील दोन पेक्षा जास्त बालकांना लाभ देण्याबाबत, दोन पेक्षा जास्त बालके एकाच कुटुंबात संगोपनासाठी देण्याबाबत तसेच कार्यरत स्वयंसेवी लाभार्थी संख्या वाढ, नवीन संस्थांना मान्यता व संस्था निवडीचे निकष, अनुदान वितरण पद्धती निश्चित करून याबाबत यापूर्वीचे सर्व शासन निर्णय / परिपत्रक अधिक्रमित करून बालसंगोपन योजनेचे नाव बदलून 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना" राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

बालसंगोपन योजनेसाठी पात्र लाभार्थी

अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही व जी बालके दत्तक देणे शक्य नाही अशी बालके. एक पालक असलेली बालके, (एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट, पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे, इ. कारणांमुळे कुटुंब विघटीत झालेली, एक पालक असलेली बालके). कुटुंबातील तणाव ,तंटे , वादविवाद ,न्यायालयीन वाद अशा सारख्या कौटुंबिक संकटात बाधित बालके. कुष्ठरुग्ण पालकांची बालके, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, तुरुंगात असलेल्या पालकांची बालके, एच. आय. व्ही. ग्रस्त पालकांची बालके, कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने बाधित पालकांची बालके. तीव्र मतीमंद बालके, एच. आय. व्ही. ग्रस्त किंवा कॅन्सरग्रस्त बालके, ४०% पेक्षा अधिक अपंगत्व असलेली, अंध, दिव्यांग बालके, भिक्षा मागणारी बालके, पोक्सो अधिनियमांतर्गत बळी पडलेली बालके, तीव्र कुपोषित बालके, सॅमबालके, दुर्धर आजार असलेली बालके, व्यसनाधीन बालके, विविध प्रकारच्या दंगलीनी प्रभावित झालेली बालके, कोविड सारख्या रोगाच्या प्रादुर्भावाने दोन्ही / एक पालक गमावलेली बालके, नैसर्गिक आपत्तीमध्ये दोन्ही / एक पालक गमावलेली बालके, बालविवाहाला बळी पडू शकणारी बालके, विधी संघर्षग्रस्त बालके, दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके. रस्त्यावर राहणारी, शाळेत न जाणारी, बालकामगार बालके. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकांची बालके. भिक्षेकरी गृहात दाखल पालकांची बालके (याबाबत भिक्षेकरी गृहाच्या अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.) बालक हे बालसंगोपन योजनेसाठी पात्र असतील.

या योजनेतंर्गत मिळणारा लाभ

या योजनेतंर्गत नुकतेच शासनाने प्रती बालक दरमहा देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात १ हजार १०० वरून २ हजार २५० तर स्वयंसेवी संस्थेच्या सहायक अनुदानात रु. १२५/- वरून रु २५०/- अशी वाढ करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून बालकांना अन्न, वस्त्र,निवारा, शिक्षण, वैद्यकीय सुविधा इ. सुविधा संबंधित कुटुंबांमार्फत पुरविण्यात येतात. तसेच स्वयंसेवी संस्थेने सहाय्यक अनुदान रकमेमधून दोन सामाजिक कार्यकर्ता व एक डेटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन, प्रत्येक बालकाची केस फाईल, त्यांचे संबंधित अभिलेख, दस्तऐवज इ. हाताळणी व संग्रहीत करण्याचा खर्च, देखरेख, गृहभेटी करीताचा प्रवासखर्च यासह सर्व प्रकारचा प्रशासकीय खर्च करण्यात येईल.बाल संगोपन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाचा कालावधी हा अनाथ, स्वत: किंवा दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके, स्वत: किंवा पालक एच.आय.व्ही./किंवा कॅन्सरग्रस्त असलेली बालके, कुष्ठरोगग्रस्त असलेली बालके, कुष्ठरोगग्रस्त पालकाची बालके, तीव्र मतिमंद बालके, अशा बालकांना वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत बाल संगोपन योजनेचा लाभ मिळेल.कौटुंबिक कलहात सापडलेल्या बालकांना कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याबाबत च्या न्यायालयीन आदेश निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यापर्यंत किंवा वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. जन्मठेपेची शिक्षा किंवा अन्य शिक्षा भोगत असलेल्या तुरूंगातील पालकांच्या बालकांना पालकांची शिक्षा संपल्यापासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. याकरिता सामाजिक तपासणी अहवालाच्या आधारे बाल कल्याण समितीने निर्णय घेईल.

भिक्षेकरीगृहात दाखल असलेल्या पालकांच्या बालकांना पालक भिक्षेकरी गृहातून मुक्त झालेल्या तारखेपासून सहा महिन्यापर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकाच्या बालकांना प्रकरण निकाली झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाची वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे इ. कारणांमुळे कुंटुंब विघटीत झाल्याने एक पालक असलेल्या बालकांना लाभ दिल्यानंतर त्याच्या पालकाने पुर्नविवाह केल्यास पुर्नविवाहाच्या तारखेपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठीचा कालावधी निश्चित करताना बाल कल्याण समितीने स्वयंसेवी संस्थेचे सामजिक कार्यकर्ता किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षातील सामाजिक कार्यकर्ता यांनी प्रत्यक्ष गृहभेट देऊन तयार केलेला सामाजिक तपासणी अहवाल विचारात घ्यावा. त्यानंतर बाल कल्याण समिती समोर प्रकरण परत्वे बालकास हजर करून अंतिम निर्णय घेतील.

लाभार्थी निवडीसाठी आवश्यक कागदपत्रे - बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ सुधारित अधिनियम २०२१ कलम२ (१४) व महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ नुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील बालके या योजनेच्या लाभासाठी पात्र असतील. लाभार्थ्याचा रहिवाशी दाखला (तलाठी / ग्रामसेवक / नगरसेवक / सरपंच यांचेकडून निर्गमित दाखला), लाभार्थ्याचे व पालकाचे आधार कार्ड (छायांकीत प्रत). लाभार्थ्याचे / पालकांचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखापेक्षा कमी असल्याबाबतचा तलाठी / तहसीलदार यांचा दाखला. दारिर्द्य रेषेखालील कुटुंबास प्राधान्य देण्यात येईल. आई / वडिलांचा अथवा दोघांच्या मृत्यू दाखला. पालक / आई/वडील यांचे समवेत घरासमोरचा फोटो. बालकांचा जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला मिळण्यास विलंब होत असल्यास मागच्या इयत्तेची गुणपत्रक किंवा बोनाफाइड प्रमाणपत्र घेण्यात यावे. बालक व पालक बाल कल्याण समितीसमोर हजर राहणे आवश्यक आहे. ३ ते १८ वयोगटातील लाभार्थी हा शिक्षण घेत असल्यास (शाळेची गुणपत्रिका/ बोनाफाईड सोबत जोडावे.) बँक अकाऊंट क्रमांक (पासबुकची छायांकित प्रत) बालकाचा सांभाळ करत असल्याबाबतचे जैविक पालकांव्यतिरीक्त संगोपन कर्त्याचे किंवा नातेवाईकांचे हमीपत्र जोडावे. ही योजना १ एप्रिल २०२३ पासून राज्यात लागू राहील. अधिक माहितीसाठी जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा.

# जगातील टॉप १० स्कूलमध्ये महाराष्ट्रातल्या ३ शाळांचा डंका



Woerld's Best School Award 2023: जगातील सर्वश्रेष्ठ शाळांच्या यादीत वेगवेगळ्या कॅटेगरीतून टॉप १० शाळांची निवड करण्यात आली आहे. सर्वात अभिमानाची गोष्ट म्हणजे तीन शाळा या महाराष्ट्रातील आहेत. देशातील पाच शाळांची निवड करण्यात आली आहे. यात एक शाळा दिल्लीतील सरकारी स्कूल आहे. तसेच गुजरातमधील खासगी आंतरराष्ट्रीय स्कूलचा समावेश आहे. २०२३ चे जगातील सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावर्षी भारतीतील पाच शाळांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रातील शाळांचा समावेश आहे. या यादीत महाराष्ट्रातील तीन शाळांचा समावेश आहे. सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कारच्या माध्यमातून तब्बल अडीच लाख डॉलरचे (US$ २,५०,०००) बक्षिस मिळणार आहे. हा पुरस्कार जगभरातील शाळांच्या समाजाच्या प्रगतीमध्ये शाळांचे योगदान पाहून देण्यात येतो.

**सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार ५ श्रेणींमध्ये**... जागतिक सर्वोत्तम शाळा पुरस्कारा साठी विविध श्रेणींमध्ये टॉप १० च्या यादीत निवडण्यात आले आहे. यात महाराष्ट्रातील तीन शाळांचा समावेश आहे. जगातील सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार ५ श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. यात समुदाय सहयोग, पर्यावरण कृती, नवीन उपक्रम, प्रतिकूलतेवर मात करणे आणि निरोगी जीवनास समर्थन देणे यांचा समावेश आहे. या पुरस्काराच्या सहाय्याने समाजाच्या पुढील पिढीच्या विकासात महत्त्वाच्या भूमिकेसाठी शाळांना प्रोत्साहन दिले जाते.

**या भारतीय शाळांचा समावेश**

पुरस्कार मिळालेल्या शाळांमध्ये दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रातील शाळांचा समावेश आहे. यात मुंबईतील दोन आणि अहमदनगर जिल्ह्यातील एका शाळेचा समावेश आहे. दिल्लीतील सरकारी स्कूल नगर निगम प्रतिभा बालिका विद्यालय (NPBV) F-Block दिलशाद कॉलनी तसेच या वर्गात मुंबईतील ओबेरॉय इंटरनॅशनल स्कूलचा देखील समावेश आहे. ही खासगी आंतरराष्ट्रीय शाळा आहे. गुजरातमधील रिव्हरसाइड स्कूल, अहमदाबाद ही देखील एक खासगी आंतरराष्ट्रीय शाळा आहे. तर ' स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल, महाराष्ट्र ' ही अहमदनगरमधील एक धर्मादाय शाळा आहे. इथे HIV/AIDS ग्रस्त मुलांचे आणि सेक्स वर्कर कुटुंबातील मुलांना शिक्षण देऊन त्यांचे जीवन बदलण्याचे मोठे काम केले जात आहे. पाचवी शाळा मुंबईतील आहे. दादरमधील शिंदेवाडी मुंबई पब्लिक स्कूल. (द आकांक्षा फाउंडेशन), ही शाळा मुंबईतील एक चार्टर स्कूल आहे.

Printed , Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) Mob.09619630035, ( REGD.No.MAHBIL/2014/56983 Email -kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी /हिंदी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री.राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१ येथून प्रकाशित केले.(रजि.नं. एमएएचबीआयएल २०१४/५६९८३)